| अ.क्र. | लक्षवेधी सूचना | विभाग |
|---|---|---|
| १ | राज्य शासनाच्या नागपूर व ठाणे या प्रादेशिक मनोरुग्णालयातील बाहयरुग्ण विभागात दररोज २५० च्या वर मनोरुग्ण तपासणीकरिता येत असणे, यातील बहुसंख्य रुग्णांवर महिनोमहिने उपचार करावे लागत असणे, गरीब मनोरुग्णालयांसाठी हे रुग्णालय आशेचा किरण असणे, त्यातच डॉक्टरांची असलेली कमतरता, पर्यायी उपचारांची असलेली वानवा अशा त्रुटींमुळे रुग्ण सेवा प्रभावित झालेली असणे, मनोरुग्णांना शांत करणारे "ओलॅन्झापीन" व "हॅलो पेरिडॉल " ही औषधे गेल्या माहे डिसेंबर, २०१६ पासून कोणत्याही प्रादेशिक रुग्णालयात उपलब्ध नसल्याने मनोरुग्णांचे हाल होऊन मनोरुग्ण आक्रमक होणे, तसेच मिरगीच्या रुग्णांना दिले जाणारे "इपिटॉइन" औषधांचाही असलेला तुटवडा, त्यामुळे रुग्णालयांमध्ये निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया. | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण |
| २ | राज्यशासनाने ग्रामीण भागातील पाच एकर आतील अल्पभूधारक शेतकरी वर्गासाठी अपघात विमा म्हणून (आम आदमी विमा) योजना सन २००७ पासून सुरु केली असणे, सदरहू योजना गोरगरीब शेतकरी वर्गापर्यंत पोहचत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, आम आदमी विमा योजनेची माहिती सर्वच अल्पभूधारक शेतक-यांना माहिती व्हावी यासाठी कृषी सहाय्यक, तलाठी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका यांच्याकडे जबाबदारी दिली असणे, परंतु यापैकी बहुतांशी कर्मचा-यांनी या योजनेची माहिती शेतक-यांना न दिल्याने या योजनेचा फायदा शेतक-यांना होत नसल्याने शेतक-यांची होणारी गैरसोय होत असल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया. | कृषी |
| ३ | तळोजा (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील प्लांट नंबर एम ७ गौसिया कोल्ड स्टोरेज कंपनीत दि. २९ जानेवारी, २०१७ रोजीच्या सुमारास तीन कामगारांचा पाण्याच्या टाकीत पडून शॉक सर्किट ने तडफडून मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना घडणे, त्यामुळे कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर येणे, या कंपनी व्यवस्थापनाने कामगारांच्या सुरक्षेची कोणतीही जबाबदारी न घेतल्याने प्राथमिक तपासात निष्पन्न होणे, तसेच तेथील कंपनीत वारंवार अपघात होऊन यात निष्पाप कामगारांचा बळी जात असणे, सदर घटना घडल्यानंतरही कंपनी व्यवस्थापनाने गुप्तता पाळून प्रकरण दडपण्याचा केलेला प्रकार, ज्या कंपन्या कामगारांच्या जिवीताशी खेळत आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यास शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत कामगारात पसरलेले कमालीचे संतापाचे वातावरण, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया. | कामगार |
| ४ | ह्दयशस्त्रक्रियांमध्ये वापरण्यात येणा-या सेंट, कॅथेटर, बलून्ससारख्या वैद्यकीय सामुग्रीसाठी रुग्णांकडून उत्पादन किंमतीपेक्षा दहापट अधिक किंमत आकारली जात असणे, वैधमापन शास्त्र विभागाने मुंबईतील आठ मोठया रुग्णालयांवर टाकलेल्या छाप्यातून धक्कादायक वास्तव माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस येणे, दुप्पट एमआरपी किंमती आकारलेले स्टेंट, कॅथेटर, बलून डिव्हाइस या ह्दयशस्त्रक्रियांमध्ये वापरण्यात येणा-या सामुग्रीचा रुग्णालयांकडून तसेच उत्पादक साखळीकडून ही लूट सुरु असणे, सदरील प्रकार राज्यातील इतर रुग्णालयांकडून सुरु असणे, असहाय्य रुग्णांची बेसुमार लूट थांबविण्याबाबत शासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, ह्दयशस्त्रक्रियेच्या सामुग्रीच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांची लूट करणा-या संबंधीत | अन्न आणि औषध प्रशासन |

| | | |
|---|---|---|
| | रुग्णालयांवर तातडीने कारवाई करुन ह्दयशस्त्रक्रियेची साधनसामुग्री रुग्णांना रास्त भावात उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | |
| ५ | लातूर येथील (जि.लातूर) एम. आय. डी. सी. परिसरातील किर्ती ऑईल मिल मधील वेस्टेज सेटलेंट टँकची स्वच्छता करण्यासाठी उतरलेल्या मजूरांपैकी ९ मजूरांचा दि.३० जानेवारी, २०१७ रोजी गुदमरुन झालेला मृत्यू, या घटनेमुळे तेथील परिसरातील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष, यासंदर्भात एम. आय. डी. सी. पोलिसात कंपनी विरुध्द तक्रार दाखल करण्यात येणे, मृत्यूमूखी पडलेल्या कामगारांच्या नातेवाईकांनी अद्याप कोणत्याही स्वरुपाची मदत कंपनीतर्फे करण्यात न येणे, यासंदर्भात चौकशी करुन कंपनी विरुध्द कारवाई करुन मृत्यूमूखी पडलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना मदत करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया. | उद्योग |
| ६ | ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्याच्या गोदामपट्टा भागातील दापोडा येथील अरिंहत कंपाऊंडमधील देढिया प्लास्टीक कंपनीतील मोती कारखान्याला दि. १९ फेब्रुवारी, २०१७ रोजी लागलेली भिषण आग, या आगीत कारखान्यातील ४ कामगारांचा झालेला दुर्देवी मृत्यु, यात ३ महिला कामगारांचा असलेला समावेश, याकारखान्यात १७ कामगार काम करीत असणे, या कारखान्यात मोती बनविण्यासाठी रसायनांचा वापर करण्यात येणे, या रसायनांच्या साठ्यास आग लागल्याचे समजल्यानंतर कामगारांमध्ये पसरलेले घबराटीचे वातावरण, इतर कामगार कारखान्याच्या बाहेर पडत असताना ४ कामगारांचा होरपळून झालेला दुर्देवी मृत्यू, कामगारांच्या सुरक्षेची काळजी न घेणाऱ्या कंपनीच्या मालकावर गुन्हा दाखल करण्याची तसेच मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. | गृह |
| ७ | पुणे शहर व जिल्ह्याचा वेगाने होणारा विकास विचारात घेता पुणे जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याची असलेली नितांत आवश्यकता, यासाठी गेल्या सुमारे दहा वर्षापूर्वीपासून राज्य शासनाकडून सुरु असलेली कार्यवाही, पुणे जिल्ह्यात उद्योग व्यापार-व्यवसायाची मोठ्या प्रमाणात असलेली उलाढाल, नवनवीन आंतरराष्ट्रीय कंपन्या पुणे जिल्हयात प्रचंड प्रमाणात करीत असलेली गुंतवणूक, मात्र विस्तार विकासात आंतरराष्ट्रीय गुंतवणूकीसाठी आंतरराष्ट्रीय विमानतळाअभावी निर्माण झालेली मोठी अडचण, विकासावर होत असलेला मोठया प्रमाणातील विपरीत परिणाम, पुणे जिल्हयात जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय गुंतवणूक व्हावी व जिल्हयातील व जवळपासच्या भागातील विकास साधता यावा, यासाठी आंतरराष्ट्रीय विमानतळ तातडीने उभारण्याची गरज, यासाठी राज्य शासनाने पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अठराशे हेक्टर जागा उपलब्ध करण्याचा घेतलेला निर्णय, मात्र पुढील कार्यवाहीस होत असलेला विलंब, याप्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याची गरज व यावर शासनाची प्रतिक्रिया. | सामान्य प्रशासन |
| ८ | राज्यातील मुलांना सदृढ व समृद्ध बनविण्याच्या द्रुष्टीकोनातून शाळेतील मुलांना मध्यान्हाय शालेय पोषण आहार योजना राबविण्यात येत असणे, यामुळे समाजात आनंदाचे वातावरण असणे, शालेय पोषण आहार योजना हि त्या संबंधित शाळेकडून कार्यान्वित करण्यात येत असणे, सदर यंत्रणा कार्यन्वित करीत असताना त्या शाळेतील सर्व शिक्षकांना यावरती लक्ष केंद्रित करावे लागत असणे, शालेय पोषण आहार योजना कार्यन्वित करण्याचे काम शाळेतील एका शिक्षकाकडे देण्यात येत असणे, त्या संबंधित शिक्षकाला आपला अध्यापनाचा वेळ सोडून त्या योजनेकडे संपूर्ण लक्ष द्यावे लागत असणे, शालेय पोषण | शालेय शिक्षण |

| | | |
|---|---|---|
| | आहार संबधित आठवाड्यातून दोन वेळा मिटिंगचे आयोजन करण्यात येत असणे, त्यामुळे त्या शिक्षकाचे त्यांच्या विषयाकडे दुर्लक्ष होत असणे, या सर्वांचा परिणाम अध्यापन प्रक्रियेवर होत असणे, शालेय पोषण आहारासाठी मिळत असलेले मानधन गेल्या दोन तीन महिन्यापासून दिले गेलेले नसणे, तसेच शालेय पोषण आहार योजना शिजवणारे मदतनीस यांचेही मानधन वेळेवर मिळत नाही त्यामुळे त्यांनाही आर्थिक समस्येला तोंड द्यावे लागत असणे, शालेय पोषण आहाराच्या विविध तक्रारी समोर येणे, यातून शाळेवरील मुख्याध्यापक, शिक्षक यांच्यावर कोणतेही कारण नसताना गंभीर गुन्हे नोंद होणे, यातून शिक्षकांना प्रचंड अशा मानसिक तणावाला सामोरे जावे लागत असणे, शालेय पोषण आहार योजना हवाबंद डब्यातून ग्रामीण भागातील मुलांना पुरविणे बाबत शासनाकडे वारंवार मागणी करण्यात येत असणे, शालेय पोषण आहार योजना स्वतंत्र यंत्रणेमार्फत राबविणेबाबत शासनाने करावयाचे प्रयत्न व शासनाची भूमिका. | |
| **९** | महाराष्ट्र राज्यात मनोरूग्णालयाच्या रूग्णांसाठी ठाणे, नागपूर आणि रत्नागिरी येथे शासकिय रूग्णालय आहेत. या रूग्णालयात वेडसर प्रवृत्तीने व मनोरूग्ण असलेल्या व्यक्तींवर उपचाराची सोय आहे. परंतू मनोरूग्ण बरे झाल्यावर कोनीही त्यांना घरे नेण्यास तयार नसणे, यामुळे रूग्णांच्या पुनर्वसनासाठी नागपूर येथे सुदामा मित्र योजनेला मंजुरी देउनही व निधी मंजूर होवूनही काम थंड बसत्यात असणे, या ४ ही रूग्णालयाची एकंदर परिस्थीती सारखीच आहे. प्रशासनाचा या रूग्णालयातील कर्मचारी तथा अधिकारी यांच्यावर कुठलाही वचप नसल्याने मनमानी कारभार सुरू असणे, अशातच नागपूर येथील मनोरूग्णालयात दैनंदित कामाच्या वेळात शासकिय तथा रूग्णालयातील कर्मचारी/अधिकारी हे काम सोडुन शासकिय जागेवर रूग्णालयात जुगार खेळतांना सापडणे, यात दररोज लाखोचा जुगार होणे, रूग्णालयात रूग्णांच्या नातेवाईकांना प्रवेश न देणे, या विपरीत असामाजिक तत्वांना प्रवेश देणे, रूग्णांच्या देखभालीकडे दुर्लक्ष करणे, त्यांचा छळ करणे, जुगार खेळतांना कर्मचारी पकडले असतांनाही त्यांच्यावर कार्यवाही न होणे, दैनिक वृत्तपत्रात जुगार खेळतांनाचे छायाचित्र प्रसिद्ध होणे, यामुळे नागरिकांमध्ये या रूग्णालयाविषयी सभ्रम निर्माण होणे या अतिमहत्वाच्या प्रश्नांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष यावर शासनाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण |
| **१०** | नागपूर येथील मिहान सेझ प्रकल्पाबाहेरील सुमारे २३० एकर क्षेत्रातील जमिन रामदेव बाबा यांच्या पतंजली समूहाला २५ लाख रुपये प्रति एकर या नाममात्र दराने देण्याचा घेण्यात आलेला निर्णय, मिहानमधील जमिनी उद्योजकांना देण्याच्या सध्याच्या निकषातील काही निकष बदलून सदर जमीन देण्यात आलेली असणे, मिहानमधील रामेदव बाबांच्या पतंजली फूड व हर्बल पार्कचे सदर जागेवर मा. केंद्रीय भूपृष्ठ मंत्री यांच्या उपस्थितीत व मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते दिनांक १० सप्टेंबर,२०१६ रोजी अथवा त्यासुमारास संपन्न झालेले भूमीपूजन, मिहान प्रकल्पाच्या बाहेरील जमिनीचा दर १ कोटी १६ लाख ३२ हजार प्रती एकर असा असणे, त्यामुळे २३० एकर जमिनीची किंमत सुमारे २६७ कोटी ५३ लाख ६० हजार एवढी असणे, असे असताना रामदेव बाबा यांच्या पतंजली समूहाला सवलतीच्या दराने म्हणजेच २५ लाख रुपये प्रती एकर या सवलतीच्या दराने जमिन देण्यात आल्यामुळे शासनाचे सुमारे २०९ कोटी रुपयांचे झालेले नुकसान, सदर नुकसान कसे भरुन काढण्यात येणार याचा विचार झालेला नसणे, यात राज्याचे हित कशाप्रकारे अपेक्षित आहे ते किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे, हे स्पष्ट झालेले नसणे, दि.१० सप्टेंबर,२०१६ रोजी सदर जमीन देण्यात आलेली असणे, शासनाच्या अटीनुसार सहा महिन्यात कामाला सुरुवात करुन १८ महिन्यात उत्पादन सुरु होणे आवश्यक असणे, मात्र त्यादृष्टीनेही कार्यवाही होत नसल्याचे दिसून येणे, यात राज्याचे अहित असल्याचे | सामान्य प्रशासन |

| | | |
|---|---|---|
| | दिसून येत असणे, त्यामुळे शासनाने या सर्व बाबी स्पष्ट करण्याची व सदरच्या नियमबाहय कृतीमुळे याबाबत फेरविचार करण्याची नितांत गरज व यावर शासनाची प्रतिक्रिया. | |
| ११ | नवी मुंबई शहर हे माहिती व तंत्रज्ञानाचे आधुनिक शहर अशी ओळख निर्माण होत असताना या शहरात लॉजिंग व बोर्डीगचे स्तोम माजले असून प्रत्येक विभागात टप्प्या टप्प्यावर असलेल्या लॉजिंग मध्ये दिवसाढवळया देहविक्रीचा व्यवसाय चालत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस येणे, परिमंडळ एकच्या उपआयुक्त कार्यालयाभोवतीच मोठ्या संख्येने लॉजिंग चालविले जात असणे, मात्र त्यावर कारवाई संबंधित प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, तसेच काही गावे लॉजिंगची केंद्र बिंदू म्हणून बदनाम होत असणे, त्यामध्ये जुहूगाव, नेरुळ, सी.बी.डी., शिरवणे, तुर्भे, दिघा व एम.आय.डी.सी. इत्यादी ठिकाणाचा समावेश असणे, यामुळे नवी मुंबई शहरात अनैतिक घटना व गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये वाढ झालेली असणे, यावर प्रतिबंध घालणेबाबत स्थानिक रहिवाशी व लोकप्रतिनिधीकडून वारंवार होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया. | गृह |
| १२ | खंबाटा एव्हिएशन कंपनीच्या सुमारे २७०० कामगारांची सुमारे १०० कोटी रुपयांची थकीत असलेली पगार व इतर देणी, त्यामुळे सदर कंपनीच्या कामगारांवर ओढवलेली बेकारीची व उपासमारीची आपत्ती, याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी मा. कामगार मंत्री यांनी मंत्रालयातील त्यांच्या दालनात संबंधितांची आयोजित केलेली बैठक, सदर बैठकीतील चर्चेनुसार पुढील कार्यवाही करण्यास होणारा अक्षम्य विलंब, कामगारांमध्ये पसरलेले असंतोषाचे व नैराश्याचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची गरज, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. | कामगार |
| १३ | राज्यात बहुसंख्येने असलेल्या मराठा समाजाचे आरक्षणाच्या मागणीसह विविध मागण्यांसाठी राज्यभर मूक मोर्चे निघालेले असणे, डिसेंबर, २०१६ मध्येही नागपूर येथेही विधान मंडळावर मराठा, कुणबी क्रांती मूक मोर्चाचे आयोजन केलेले असणे, या मोर्चासाठी राज्यभरातून लाखो मराठा समाज बांधवांनी सहभाग घेतलेला असणे, संपूर्ण राज्यात संवेदनशील बनलेल्या आरक्षणाच्या मुद्यावर सभागृहात चर्चा होऊनही समाज बांधवांचे समाधान झालेले नसणे, सरकारच्या वतीने दिलेल्या उत्तरात आरक्षण व इतर मागण्यांबाबत कोणताही ठोस निर्णय घेतलेला नसणे, त्यामुळे समाजात निर्माण झालेला असंतोष, राज्याच्या प्रमुखांना हदगांव आणि धर्माबाद येथील प्रचार सभेत या असंतोषाचा सामना करावा लागणे, मा. उच्च न्यायालयात या प्रकरणी सुरु असलेल्या याचिकेत शासनाकडून दर सुनावणीत वेगवेगळ्या भूमिका घेण्यात आल्याने सुनावणी प्रलंबित पडणे, शांततेच्या मार्गाने आंदोलन करुनही सरकार आपल्या मागण्यांकडे करीत असलेल्या दुर्लक्षामुळे समाजात निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीचे वातावरण, याबाबत तातडीने निर्णय जाहीर करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | सामाजिक न्याय |
| १४ | मुंबईतील अरबी समुद्रात जागतिक दर्जाच्या भव्य शिवस्मारकाचे मा.पंतप्रधान यांच्या हस्ते भुमीपुजन करण्यात येणे, अरबी समुद्रातील शिवस्मारकाला मच्छिमार बांधवांनी विरोध दर्शविला असणे, सदरील मच्छिमार बांधवांचा विरोध दडपविण्याचा होत असलेला प्रयत्न, शिवस्मारकाला मच्छिमार बांधवांनी विरोध का दर्शविला चौकशी करण्यात न येणे, मासेमारीवर परिणाम होण्याच्या भितीने अरबी समुद्रात उभारल्या जाणा-या शिव स्मारकाला मच्छिमार संघटना तसेच सागरी जैवेविध्य बाधित होणार असल्याने पर्यावरणवादीने विरोध दर्शविल्याने शिवस्मारक उभारण्यात येणारे प्रकल्पाचा मुद्दा हरित लवादाकडे | सामान्य प्रशासन |

| | | |
|---|---|---|
| | पाठविण्यात येणे, हरित लवादाची परवानगी प्रलंबित असणे, स्मारकाच आराखडयाचे काम मार्गी लावल्याचा राज्य सरकारने गाजावाजा केला असला तरी प्रत्यक्षात सदरील प्रकल्प रखडल्याने किती दिवसात पुर्ण करण्यात येणार आहे याबाबत जनमानसात प्रश्न असणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे भूमीपुजन इंदू मिलमध्ये दोन वर्षापूर्वी झाले पण प्रत्यक्षात तिथे कसलेही काम सुरु झाले नसल्याने शिवाजी महाराजांचे स्मारक हाेईल का नाही अशी महाराष्ट्र जनतेची निर्माण झालेली भावना शिवस्मारकाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी ३६०० कोटी खर्चाची तरतूदी शासनाकडून कोणती स्पष्टता व्यक्त करण्यात न येणे, जनमानसात शिवस्मारक उभारण्याबाबत शाक्षंकता व्यक्त होत असल्याने शिवस्मारक उभारण्याबाबत शासनस्तरावरुन तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | |
| **१५** | बृहन्मुंबई महानगरपालिकेत रस्त्यांच्या कामांमध्ये सुमारे ३५० कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याप्रकरणी चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवडयाच्या सुमारास पहिल्या फेरीचा सादर केलेला अहवाल, त्यात रस्त्यांच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता होऊन सुमारे ३५२ कोटी रुपयांचा घोटाळा झालेला असल्याचे नमूद केलेले असणे, आणखी २०० रस्त्यांच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आलेले असणे, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेत सन २०१२ ते २०१६ या कालावधीच्या सुमारास कचरा वाहून नेण्याच्या कामात सुमारे ९०० कोटी रुपयांचा घोटाळा झालेला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ च्या पहिल्या आठवडयाच्या सुमारास उघडकीस आलेले असणे, याबाबतच्या चौकशीकडे होत असलेला विलंब, त्याचप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नालेसफाईच्या कामात झालेल्या सुमारे २८० कोटी रुपयांच्या झालेल्या गैरव्यवहाराबाबत राजीव कुकनूर समितीचा अहवाल माहे डिसेंबर, २०१६ च्या पहिल्या आठवड्याच्या सुमारास महापालिका आयुक्तांना सादर करण्यात आलेला असणे, या कोटयावधी रुपयांच्या घोटाळयाप्रकरणी कारवाई करण्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कारवाई. | नगर विकास |
| **१६** | नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा जागतिक सर्वात मोठा ग्रीनफील्ड विमानतळ होणार असणे, नवी मुंबईतील प्रलंबित आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारणीचे काम जीव्हीके ही कंपनी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (मिआल) यांच्या भागीदारीतून २०१९ पर्यंत पूर्ण करण्यात येणार असणे, या विमानतळ प्रकल्पाला पर्यावरण विषयक मान्यता घेण्याबाबत, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, जमिनीचा भराव ही कामे पुर्ण होण्यास विलंब या कारणास्तव सदरील कंपनीने माघार घेतल्याचे पुढे आले होते, प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा जागतिक सर्वात मोठा ग्रीनफील्ड विमानतळ होणार असणे, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील हवाई वाहतूकीचा ताण कमी करण्यासाठी याची निर्मितीची आवश्यकता असणे, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची प्रतिवर्ष प्रवासी क्षमता ४० दशलक्ष पर्यंत वाढण्याची शक्यता असणे, सन २०१३ वर्षात या क्षेत्रातील वाहतुक क्षमता १०० दशलक्ष प्रवासी प्रतिवर्ष एवढी होणार असणे, त्यामुळे ६० दशलक्ष क्षमतेच्या नवी मुंबई विमानतळाची गरज निर्माण झाली असणे, नवी मुंबई येथे विमानतळ झाल्यास रोजगार आणि व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध होणार असणे, राज्यशासनाने सदरील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याबाबत येणा-या अडचणी दुर करुन प्रकल्पाचे कामे लवकरात लवकर सुरु करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | नगर विकास |
| **१७** | मुंबई, पुणे, नागपूर इत्यादी शहरातील वाहतूकीची समस्या सोडविण्यासाठी अनेक मेट्रो प्रकल्पांना देण्यात आलेली मान्यता, त्यापैकी काही मेट्रो प्रकल्पांचे मा. पंतप्रधानांच्या हस्ते दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी संपन्न झालेले भूमिपूजन, मात्र या प्रकल्पांच्या कामांसाठी लागणारा निधी, प्रकल्पांची कामे सुरु | इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे |

| | | |
|---|---|---|
| | करण्याचा व त्यांच्या पूर्णत्वाचा कालावधी, आराखडे याबाबत संदिग्धता दिसून येणे, पुणे मेट्रो प्रकल्पाला मान्यता देण्यात आल्यानंतर व मा. पंतप्रधानांच्या हस्ते त्याचे भूमीपूजन झाल्यानंतर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने कामांना दिलेली स्थगिती, इतर काही प्रकल्पांबाबतही शासकीय यंत्रणांकडून घेण्यात येत असलेले आक्षेप, यातून प्रशासकीय यंत्रणांकडून झालेला निष्काळजीपणा, असे आक्षेप निर्माण झाल्यास प्रकल्पांच्या कामांमध्ये अडथळा निर्माण होण्याची असलेली शक्यता, त्यामुळे याबाबत त्वरीत आढावा घेऊन सर्व प्रकल्पांमध्ये काही त्रुटी असल्यास त्या दूर करण्याची आवश्यकता, प्रकल्पनिहाय लागणारा निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार, प्रकल्पांचे आराखडे, कामाचा कालावधी इत्यादी बाबींची स्पष्टता करण्याची गरज व यावर शासनाची प्रतिक्रिया. | नेमून न दिलेले विषय |
| **१८** | पालघर जिल्हयासह राज्यातील १६ आदिवासीबहुल जिल्हयात बालमृत्यूच्या प्रमाणात दुप्पट वाढ झाल्याची माहिती उजेडात येणे, मोखाडा येथील घटनेनंतर मा.आदिवासी मंत्री महोदयांच्या वादग्रस्त विधानानंतर कुपोषित बालके तसेच मातांच्या योजनांचा अंमलबजावणीमधील गंभीर तफावती उघडकीस येणे, आदिवासी लोकसंख्येनिहाय अर्थसंकल्पात नऊ हजार कोटी रुपयांची तरतूद असणे आवश्यक असताना आदिवासींच्या अनेक योजना आदिवासी बांधवांपर्यंत पोहोचत नसणे, आदिवासी तसेच आश्रमशाळांमधील लाखो मुलांसाठीच्या योजनेंचे खरे लाभार्थींना लाभ मिळत नसून भ्रष्टाचारामुळे कंत्राटदार इतर अधिका-यांना लाभार्थींना लाभ मिळत असणे, आदिवासी जिल्हयात प्राथमिक आरोग्य केंद्रावर डॉक्टर आहेत तर औषधे नाहीत आणि औषधे आहेत तर डॉक्टर बेपत्ता असल्याचे चित्र समोर येणे, आदिवासी भागात काम करणारे आयुर्वेदिक डॉक्टर हे ख-या अर्थाने सेवेचा कणा असताना कमी वेतनात हंगामी म्हणून काम करीत असणे, त्यांना सेवे समावून घेण्याबाबत शासन विलंब करीत असणे, एमबीबीएस डॉक्टर आदिवासी भागात काम करण्यास तयार नसणे, आदिवासी, महिला व बालविकास, आरोग्य विभागांच्या कोणताही समन्वय नसल्याने तिन्ही विभागाचे सचिव एकत्रिपणे काम करत नसल्यामुळे आदिवासींच्या विकासापासून ते गर्भवती मातांना पोषण आहार मिळण्यापर्यंत योजना प्रभावीपणे राबविण्यात येत नसणे, राज्यशासनाकडून आदिवासी जिल्हयात कुपोषणामुळे वाढत्या बालमृत्यू रोखण्यास येत असलेले अपयश त्यामुळे जनमानसात शासनाबाबत तीव्र असंतोष निर्माण होणे, राज्यशासनाने आदिवासी जिल्हयात कुपोषणामुळे बालमृत्यू रोखण्यासाठी कुपोषण टास्क फोर्स उभारण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण |
| **१९** | राज्यशासनाने महत्वाकांक्षी स्मार्ट सिटी शहरांच्या तिसऱ्या यादीत ठाणे आणि कल्याण-डोंबिवली शहरांचा समावेश करण्यात येणे, राज्यशासनाने केलेल्या स्मार्ट सिटी शहरांच्या प्रकल्पांच्या विकासाच्या केलेल्या घोषणांनुसार सदरील प्रकल्पांवर प्रत्यक्ष कामांना सुरुवात झालेली नसणे, स्मार्ट सिटी उभारणा-या कामांना गती न मिळण्याबाबत शासनाकडून कुठेलेली स्पष्ट व्यक्त होत नसणे, स्मार्ट सिटीत निवड झालेल्या कल्याण-डोंबिवलीत पाच वर्षात दोन हजार ३२ कोटीची विकासकामे केली जाणार असून राज्यातील स्मार्ट सिटीसाठी अमेरिकेतील जगप्रसिध्द ओरॅकेल कंपनीशी सामंजस्य करार केला जाणार असणे, कल्याण-डोंबिवली शहरात स्मार्ट सिटीच्या माध्यमातून कल्याण-डोंबिवलीमधील मोठी संख्या असलेल्या जुन्या धोकादायक इमारतींचा पुर्नविकास करण्याची गरज असणे, आधारवाडी डंम्पिग ग्राऊंड प्रश्न तीव्र असून कल्याण-डोंबिवली रेल्वे स्थानकांची वाहतूक कोंडी, पाणीपुरवठा, रस्ते सुधारणा, जल-मल:निस्सारण, कचरा प्रकल्प, मोठया रस्त्यांची झालेली दुरदर्शी वाढती वाहतूक कोंडी, कंपनीच्या प्रदुषणांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, झोपडपट्टी | नगर विकास |

| | | |
|---|---|---|
| | सुधारणा, आपत्ती व्यवस्थापनेचा प्रश्न, प्रदुषण निर्मूलन आदी अनेक प्रश्न स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या माध्यमातून तातडीने सोडविण्याची आवश्यकता, राज्यशासनातर्फे कल्याण-डोंबिवली येथे स्मार्ट सिटी उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाची तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | |
| २० | मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी सुमारे ९८ हजार कोटी रुपयांचा खर्च येणार असून राज्याला २४ हजार कोटी रुपयांचा भार उचलावा लागणार असणे, मुंबई-अहमदाबाद महत्वाकांक्षी बुलेट ट्रेनसाठी मुख्य स्थानक म्हणून वांद्रे-कुर्ला संकुलातील ४० हजार चौरस मीटर जागा देण्याचे राज्यशासनाने निश्चित केले असणे, सदरील महत्वाकांक्षी बुलेट ट्रेन प्रकल्पात राज्यात बुलेट ट्रेनचे क्षेत्र ३३ टक्के असून ७७ टक्के गुजरातमध्ये असल्याने गुजरात राज्याला सर्वाधिक लाभ होणार असल्याने समान खर्च उभारण्याबाबत राज्यातून होत असलेला विरोध, याकरीता मुंबई-नागपूर बुलेट ट्रेनसाठी केंद्र सरकार मान्यता द्यावी अशी राज्य शासनाने करण्यात आलेली मागणी, मुंबई-अहमदाबात बुलेट ट्रेन प्रकल्पाचा आराखडा निश्चित होत नसणे, या महत्वाकांक्षी प्रकल्प सुरु होण्या आधी अनेक अडचणी येत असल्याने सदरील प्रकल्प पुर्ण होण्याचा प्रश्न ऐरणीवर येणे, जनमानसात सदरील प्रकल्प सुरु होणार की नाही याबाबत प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे राज्यशासनाने मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाबाबत आपली भुमिका स्पष्ट करुन याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | नगर विकास |
| २१ | मुंबई-नागपूर या समृध्दी हायवेत २७ गावांतील हजारो हेक्टर जमीन लॅण्ड पुलिंग अंतर्गत संपादित केला जाणार असणे, समृध्दी हायवेला शहापूर तालुक्यातील शेतक-यांनी तीव्र विरोध केला असून या विरोधात स्थापन झालेल्या संघर्ष समितीवर वनखात्याची जमीन मोजणीच्या कामात मज्जाव केल्याप्रकरणी पोलिसांनी या संघर्ष समितीवर गुन्हा दाखल करण्यात येणे, समृध्दी हायवेत शेतक-यांचा विरोध लक्षात घेता संघर्ष समितीबरोबर मा.मुख्यमंत्री सोबत झालेल्या बैठकीत शेतक-यांना विश्वासात घेऊनच या हायवेची निर्मिती केली जाणार असल्याचे महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या अधिका-यांना सूचना करुनही या सुचनेला संबंधित अधिकारी बगल देत असणे, मुंबई-नागपूर या समृध्दी हायवे प्रकरणातील पोलिस बळाचा वापर करुन शेतक-यांवर केलेल्या खोटया गुन्हे दाखल करीत असणे, समृध्दी महामार्गावरील शेतक-यांच्या बळजबरीने घेत असलेल्या जमिनीबाबत शेतक-यांमध्ये शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, मुंबई-नागपूर या समृध्दी महामार्गाच्या प्रकल्पामध्ये शेतक-यांवर होत असलेल्या अन्यायबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | |
| २२ | केंद्र शासनाने चलनबंदीचा निर्णय घेतल्यामुळे राज्यातील मुद्रांक शुल्कातून मिळणाऱ्या महसूली उत्पन्नात सुमारे १ हजार कोटी रुपयांचा फटका शासनाला बसलेला असणे, त्यामुळे राज्याच्या विकासकामावर होत असलेला विपरीत परिणाम, जानेवारी २०१६ पर्यंत राज्याच्या मुद्रांक शूल्काचा महसूल १७ हजार १४४ कोटी रुपये असणे, आता या वर्षी जानेवारी २०१७ अखेर राज्याचा महसूल १६ हजार २५४ कोटी रुपये खाली घसरणे, याचा मोठा फटका बांधकाम व अन्य उद्योगांना बसला असून बांधकाम व्यवसाय अडचणीत आलेला असणे, या चलनबंदीमुळे जागांच्या व घरांच्या किंमतीतही घट होऊन घरखरेदीचे व्यवहार मंदावले असणे, मुद्रांक शूल्क हा राज्य शासनाच्या महसूलाचा आणि उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असून चलनबंदीमुळे हा स्त्रोत ५० दिवस बंद राहील्यामुळे व अद्यापही हे व्यवहार गतीमान न झाल्यामुळे राज्याच्या मुद्रांक शूल्क महसूलात प्रचंड प्रमाणात घट होणे, यावर तातडीने उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | महसूल |

| | | |
|---|---|---|
| २३ | कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून २७ गावे वगळण्याबाबत राज्य शासनाने कोकण विभागीय आयुक्तांना अहवाल सादर करण्यास सांगितले असल्याचे माहे जाने.२०१७ च्यासुमारास उजेडात येणे, कोकण विभाग आयुक्तांनी २७ गावे महापालिकेतून वगळण्यात यावी अशी शिफारस शासनाला केलेली असणे, डोंबिवलीलगत असलेल्या २७ गावांची स्वतंत्र नगर परिषद करण्यात येईल असे आश्वासन निवडणूकीच्या काळात मा.मुख्यमंत्री महोदयांनी २७ गावांतील रहिवाशांना देण्यात येणे, या आश्वासनाला एक वर्ष पूर्ण होत असून अद्याप याविषयी कोणतीही ठोस पावले उचलली गेली नसल्याने २७ गावांतील नागरिक शासनावर नाराज असणे, यासंदर्भात डिसेंबर-२०१६ च्या हिवाळी अधिवेशनात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रश्न विचारला असता या प्रश्नाला उत्तर देताना नगरविकास राज्यमंत्री महोदयांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नोटीकेशन काढून त्यावर हरकती व सूचना मागविण्यात येऊन त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन देण्यात येणे, कल्याण-डोंबिवली महापालिकेतून २७ गावे वगळण्याबाबत राज्य सरकारने कोकण विभागीय आयुक्तांना अहवाल सादर करण्यास सांगणे, त्यानुसार कोकण विभाग आयुक्तांनी महापालिकेतून वगण्यात यावी अशी शिफारस केली असून राज्य शासनाकडे सदरील प्रश्न प्रलंबित असणे, शासन या संदर्भात निर्णय घेण्यास टाळाटाळ करीत असणे, या गावांमधील दैनंदिन कामकाजाची घडी महापालिकेस नीट बसवता आलेली नसणे, मालमत्ता कराच्या बिलावरुन रहिवाशांमध्ये संभ्रम असणे, मालमत्ता कराचा बिलांचा भरणा ग्रामीण भागातील रहिवाशी तयार नसणे, डोंबिवली-कल्याण महापालिकेत समावेश केलेल्या २७ गावांना आवश्यकते महापालिकेकडून सोयीसुविधा मिळत नसल्याने स्वतंत्र नगर परिषद करण्याची मागणीला जोर पकड असणे, शासनाकडून आश्वासन मिळून त्यांची अंमलबजावणी करण्यास विलंब लावीत असल्याने राज्यशासनाच्या विरोधात २७ गावातील रहिवांशाने आक्रमकतेचा पवित्रा घेऊन रस्ता रोको, उपोषणाचा घेण्यात आलेला निर्णय, राज्यशासनाने डोंबिवली लगत असलेल्या २७ गावांना स्वतंत्र नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | नगर विकास |
| २४ | मुंबईतील आरे कॉलनीत मुंबई मेट्रो-थ्री च्या कार डेपोचा एकमेव प्रकल्प उभा राहणार असणे, सदरील कार डोपो उभारणा-या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने डेपोबरोबरच त्याच जागेवर टोलेजंग निवासी टॉवर्स आणि व्यावसायिक संकुले उभी करण्यासाठी राज्य सरकारकडे ३ एफएसआयची मागणी करण्यात येणे, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने तीन एफएसआयची मागणी केल्यानंतर राज्य सरकारने त्यावर हरकती आणि सुचना मागविण्यात येणे, आरेचा भूखंड बिल्डरांच्या घशात घालून मुंबईकरांचा एकमेव ऑक्सिजन म्हणून ओळखलेल्या जागेवरच डाका टाकण्याचा मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा डाव असल्याचे उघड होणे, राज्य सरकारने मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन ची तीन एफएसआयची मागणी मागणी मंजूर झाल्यास बिल्डरांचा त्याचा फायदा होणार असल्याने शासनाच्या या निर्णयाबाबत जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, राज्यशासनाने आरेचा भूखंड बिल्डरांच्या घासात घालू नये याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | नगर विकास |
| २५ | राज्यात यावेळी तुरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होणे, तुरीचा हमीभाव ५ हजार ५० रुपये असताना शेतकऱ्यांना ४ हजार १०० रुपये प्रति क्विंटलने तुर विकावी लागत असणे, हमी भावापेक्षा कमी भावाने तुरीची विक्रिकरावी लागत असल्यामुळे शेतकऱ्यांचे होत असलेले आर्थिक नुकसान, याचा मोठा फटका राज्यात जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बसत असून राज्यात बाजारपेठेत दररोज तुरीची आवक वाढत असून शेतकऱ्यांना दोन-दोन दिवस शासकिय खरेदी केंद्रावर थांबून सूध्दा शेतकऱ्यांकडून तुर खरेदी करण्याऐवजी खाजगी व्यापाऱ्यांकडून तुर खरेदी करण्यात येत असणे, यामुळे तेथील शेतकऱ्यांत पसरलेला | कृषी |

| | | |
|---|---|---|
| | तीव्र असंतोष, हमी भावानूसार शेतकऱ्यांची तूर खरेदी करण्याबाबत व खाजगी व्यापाऱ्यांकडून तूर खरेदी न करता शेतकऱ्यांकडूनच आधी तूर खरेदी करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. | |
| २६ | मुंबईसह राज्यात किमान सात हजार बेकायदा पॅथलॅब असून त्यामुळे रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होत आहे हे सरकारच्या वारंवार निदर्शनास आणूनही बोगस पॅथलॅबवर कोणती कारवाई करण्यात न येणे, प्रत्येक लॅबमध्य पॅथॉलॉजिस्टची नियुक्ती करणे कायद्याने बंधनकारक असणे, परंतू राज्यात अनेक ठिकाणी केवळ डिप्लॉमाधरक टेक्निशियनची नियुक्ती करुन पॅथॉलॉजी लॅब सुरु असणे, अनेक लॅबमध्ये टेक्निशियनच वैद्यकिय चाचण्यांचे अहवाल तयार करुन त्यावर पॅथॉलॉजिस्टच्या सहया करीत असणे,राज्यात अशा किमान सात हजार पॅथॉलॉजी लॅब असल्याची तक्रार महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजिस्ट ऍ़ंड मायक्रोबायलॉजिस्ट संघटनेकडे असणे, मान्यताप्राप्त पॅथॉलॉजीस्टची नियुक्ती न करता केवळ टेक्निशियनच्या जोरावर पॅथलॅब चालवण्यास बंद घालणारे पत्रक राज्य सरकारने २४ मे २०१६ रोजी जारी केले परंतू दोन दिवसांनी सरकारनेच या पत्रकाला स्थिगिती देण्यात येणे, राज्य शासनाने बेकायदा लॅबपॅथला दिलेल्या अभयामुळे सर्वसामान्य जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, राज्यशासनाने राज्यात सुरु असलेल्या बेकायदा लॅबपॅथवर बंदी घालण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. | वैद्यकीय शिक्षण |
| २७ | मुंबईत वरळी, नायगाव, डिलाईल रोड आणि शिवडी या परिसरात बीडीडी चाळी असणे, ब्रिटीशांनी १९२० मध्ये या चाळींचे बांधकाम केले असणे, मुंबईतील सर्वात जुन्या असलेल्या बीडीडी (बॉम्बे डेव्हलमेंट डिपार्टमेंट) चाळी सध्या पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असणे, बीडीडी चाळी अनेक कुटूंब वर्षानुवर्षे राहत असणे, बीडीडी चाळीमध्ये सांडपाणी समस्या, अनेक चाळींच्या आतील भागात भिंतीचे, छप्परांची दुरावस्था झालेली असणे, पिण्याच्या पाण्याची समस्या अश्या अनेक अडचणीला रहिवाशांनी तोंड द्यावे लागत असणे, बीडीडी चाळीवासीयांना पुनर्वसनामध्ये ४०० चौरस फुटावरून थेट ५०० चौरस फुटाची घरे उपलब्ध करुन देण्याचा शासनाने निर्णय शासनाने घेतल्याचे माहे सप्टेंबर-२०१६ च्यासुमारास उजेडात येणे, या निर्णयाबाबत रहिवाशी नाखूश असून रहिवाशांना ५७५ चौरस फुटाची घरे हवी असणे, तसेच नवी सुधारित नियमावली लागू करुन चाळीवासीयांच्या संमतीची अट काढून टाकण्यात आल्याबद्दल बीडीडी चाळीतील रहिवाशांकडून नाराजी व्यक्त करणे, बीडीडी चाळीच्या पुनर्वसनाबाबत जे गिरणी कामगारांच्या घरांचे झाले तेच बीडीडी चाळीवासीयांबाबत होण्याची भिती व्यक्त करण्यात येणे, शासनाने वरळी, नायगाव,डिलाइल रोड आणि शिवडी या परिसरातील बीडीडी चाळींच्या पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | गृहनिर्माण |
| २८ | राज्यात सत्तेवर येण्यापुर्वी राज्यातील धनगर समाजाला आरक्षण देण्याचे आश्वासन देण्यात आले होते, धनगर समाजाला आरक्षण देण्याचा प्रश्न प्रलंबित असणे, धनगर आरक्षणाबाबत राज्य सरकार गंभीर नसणे, धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत मागील दीड वर्षापासून राज्य सरकार वेळकाढूपणाचे धोरण अवलंबित असणे, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती पार्श्वभुमीवर धनगर समाज आरक्षणाबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी आरक्षणाबाबत तातडीने निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते, परंतू याबाबत शासनाकडून कोणती आश्वासनाची पुर्तता करण्यात न आल्याने धनगर समाजाकडून | सामाजिक न्याय |

| | | |
|---|---|---|
| | वारंवार होत असलेले धरणे, आंदोलने यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेल प्रश्न, याकरिता राज्यशासनाने धनगर समाजाचा प्रलंबित असलेला आरक्षणाचा प्रश्न लवकरात लवकर तातडीने सोडविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | |
| २९ | मुंबईतील ५८ गिरण्यापैकी केवळ ३१ गिरण्यांच्या जमिनीवर २४ हजार ७०० घरे म्हाडाने बांधली असून त्यातील कवेळ १६ हजार ९०० घरे गिरणी कामगारांसाठी असल्याचा दावा म्हाडा करीत असले तरी याबाबत गिरणी कामगार संघटना समाधानी नसणे, गिरण्यांची एकूण किती जागा आहे, त्यातील किती विकसित करण्यात आल्या आहेत, किती करण्यात येणार आहेत आणि किती गिरणी कामगारांना घरे देण्यात येणार आहे याची नेमकी माहिती शासनाकडे उपलब्ध नसणे, गिरणी कामगारांच्या पुनर्वसनाच्या कित्येक वर्षापासून रखडलेल्या मुदयाकडे शासन गंभीरपणे घेत नसणे, गिरणी कामगारांची संख्या १ लाख २८ हजार असून त्यापैकी प्रत्येकाला घरे देणे शक्य नाही आणि सदनिकांसाठी निकष लावण्यची जबाबदारी म्हाडाची असल्याचे भूमिका राज्य सरकारने स्पष्ट केली होती, सरकार आणि म्हाडा एकमेकांकडे बोट दाखवत जबाबदारी झटकण्याचा आणि आकडेवारी सांगण्यात टाळाटाळ करीत असणे, त्यामुळे गिरणी कामगारांच्या कुटूंबियांमध्ये तसचे जनमानसात शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणत, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | गृहनिर्माण |
| ३० | मुंबई महापालिकेने नरिमन पॉईट ते मालाड-मार्वेपर्यंत पश्चिम बाजूस समुद्र किनारपटटीलगत काही भागात भराव टाकून रस्ता बांधणे, काही भागात पूल व उन्नत मार्ग, काही भागात बोगदे यांचा समावेश असलेलया ३५.६० कि.मी.लांबीचा समुद्रकिनारी मुक्त मार्ग (कोस्टल रोड) बांधण्याचा घेण्यात आलेला निर्णय, नरिमन पॉईट ते मालाड मार्वे पर्यंत समुद्र किनारी रस्ता प्रकल्पासाठी तांत्रिक सल्ल्यासाठी नियुक्त केलेल्या स्टूप कन्सल्टंट या सल्लागार कंपनीने केलेली भूगर्भ तपासणी आंतरराष्ट्रीय मान्यतेनुसार केलेली नसल्याने त्यामुळे पुन्हा एकदा भूगर्भ तपासणीसाठी सल्लागारांची निवड करण्याची वेळ महापालिकेवर आलेली वेळ, सदरील सल्लागार समितीवर महापालिकेने केलेला कोटयावधी रुपयांचा खर्च वाया जाणे, कोस्टल रोड प्रकल्पामुळे मुंबईच्या समुद्र किना-यावरील ऐतिहासिक स्थळांच्या सौदर्याला बाधा येत असल्याचा आक्षेप घेत हेरिटेज समितीने महापालिकेचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प फेटाळण्यात येणे, मुंबई सागरी किनारी रस्त्यासाठी विविध परवानगींची आवश्यकता असून नौदलाच्यावतीने या किनारी मार्गाला परवानगी प्राप्त झालेली असलीतरी पर्यावरण आणि सीआरझेडची परवानगी अद्यापही मिळालेली नसणे, सदरील कोस्टल रोड तयार होण्यापुर्वी करोडो रुपये सल्लागार कंपनीवर खर्च करुनही कोस्टल रोड प्रकल्प उभारण्याबाबत कार्यवाही होण्यास विलंब होत असल्याने जनमानसात शासनाबाबत तीव्र असंतोष निर्माण होणे, राज्याशासनाने सदरील महत्वाकांक्षी प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | नगर विकास |
| ३१ | मुंबईतील वांद्रे येथील लीलावती, मुलूंड येथील फोर्टीस, अंधेरीचे कोकिलाबेन अंबानी, परळचे ग्लोबल, पवईमधील हिरानंदानी आणि गिरगावातील सर एच.एन.रुग्णालय वैद्यकीय उपकारणांवरील छापील किंमतीपेक्षा अधिक किंमत रुग्णांकडून उकळून रुग्णांची पिळवणूक करीत असल्याची बाब उजेडात येणे, राज्यशासनाने जसलोक, ब्रीच कॅन्डी, बॉम्बे हॉस्पिटल, लिलावती, हरकिसनदास, नानावटी, हिंदुजा अशा अनेक खाजगी धर्मादाय हॉस्पिटलला ना माफक दरात जागा दिलेली असणे, त्याबदल्यात त्यांच्यावर घालण्यात आलेल्या अटीनुसार गरिब रुग्णांना सवलतीच्या दरात आरोग्य सुविधा पुरविण्याची त्यांच्यावर जबाबदारी असणे, सदरील धर्मादाय हॉस्पिटल बदल वारंवार तक्रारी येऊनही कोणतीच कारवाई करण्यात न येणे, नियमानुसार सदर हॉस्पिटलांना | सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण |

| | | |
|---|---|---|
| | एकूण खाटांच्या ( बेडच्या) २० टक्के बेड गरिब रुग्णांसाठी आरक्षित ठेवणे, स्वत दरात औषधे उपलब्ध करणे बंधनकारक असणे, परंतू सदर रुग्णालये नियम तोडून कागदोपत्री पुरावे न ठेवून आरक्षित बेडची सुविधा इतर रुग्णांना पुरवित असणे, यामध्ये कागदोपत्री खोटा रिपोर्ट करत असल्याने आढळून येणे. मा. मुख्यमंत्र्यांनी अशा प्रकारचा गैरव्यवहार रोखण्याच्या दृष्टिने रुग्णांच्या रेशन कार्ड तसेच दारिद्ररेषेखाली असल्याचा पुरावा ऑनलाईन तपासण्याचे सॉफटवेअर तयार करण्याचे संबंधित सुचना दिल्या असणे, त्याच्याकडेही सदर रुग्णालयाने कानाडोळा करीत असणे, यामुळे शासन निर्णय जारी करुन देखील सदर रुग्णालयाचे शासनास दाद देत नसल्याचे आढळून आल्याने राज्यातील रुग्णांमध्ये व जनमानसात पसरलेली चिडीची व असंतोषाची भावना, याकरिता राज्यशासनाने धर्मादाय रुग्णालयाकडून गरिब रुग्णांची होत असलेली फसवणूक रोखण्याबाबत व सदरील रुग्णालयाचा गैरव्यवहाराबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | |
| **३२** | राज्यात दुध उत्पादक कंपन्या जवळपास खेडयांमधील शेतक-यांकडून दररोज दूध गोळा करतात मात्र ते ताजे दुध ग्राहकांकडे पोहचेपर्यंत त्याचं विषात रुपांतर झालेले असते, दुधात डिटर्जंट पावडर, युरिया, स्कीम्ड दूध पावडर, कॉस्टीक सोडा, ग्लुकोज, पांढरा रंग, रिफाइंड तेल, मीठ, स्टार्च असे विविध घटक समाविष्ट करुन अनेक समाजकंटक थेट लोकांच्या जीवाशी खेळ खेळीत असणे, डिटर्जंट पावडर, मीठ व ग्लुकोजसारख्या घटकांमुळे दुधात दाटपणा येतो तर टार्चमुळे दूध नासण्यास प्रतिबंध होतो त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना भेसळयुक्त दूध केवळ बघून ओळखता येत नसणे, पोलीस व अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने वेळोवेळी छापे घातल्याने आतापर्यंत दुध भेसळीचे असे अनेक प्रकार उघडकीस आणले परंतू तरीही या प्रश्नी सरकारकडून ठोस कारवाई होत नसणे, दुध भेसळीचे प्रकार मुंबई व छोटया शहरामध्ये सर्रास सुरु असणे, भेसळयुक्त दूध पुरवणे म्हणजे ग्राहकांवर हळूहळू विषप्रयोग केल्यासारखे प्रकार असणे, दुधात भेसळ करुन काही टोळयांचे समाजकंटक नागरिकांच्या जिवाशी खेळत असल्याने दुधात भेसळ करणा-या समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | अन्न आणि औषध प्रशासन |
| **३३** | मुंबई शहरात २६ लाख ९५ हजार ४३५ वाहने रस्त्यावर धावत असल्याची नोंद असणे, मुंबई तील वाहन नोंदणीत दिवसेंदिवस वाढ होत असणे, वाढत्या वाहनसंख्येवर नियंत्रण नसल्याने मुंबई शहराला वाहतूककोंडी आणि पार्किंगसारख्या गंभीर समस्येला तोंड द्यावे लागत असणे, पार्किंगसाठी सरकारी, खासगी कार्यालयाबरोबरच सोसायटयांमध्येही जागा शिल्लक न राहिल्याने रस्त्यावरील पार्किंगमध्ये प्रचंड वाढ होत असणे, सन २०१५ मध्ये नो पार्किंग झोनमध्ये कारवाई केलेल्या वाहनांची संख्या जवळपास ७ लाख ११ हजार ११३ अशी असणे, कारवाई पाहता पार्किंगचा मुददा किती महत्वाचा आहे ते दिसून येणे, पोलिसांकडून अनधिकृत पार्किंगवर सातत्याने कारवाई करुन पार्किंगची समस्या जैसे थे परिस्थितीत असणे, दिवसेंदिवस मुंबई ,उपनगर, ठाणे शहरातील पार्किंगच्या समस्या जठील होत असल्याने वाहतुक कोंडीमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असणे, राज्यशासनाने मुंबई तील पार्किंग समस्या सोडविण्यासाठी धोरण आखून पार्किंग समस्या सोडविण्याकरीता करावयाची कार्यवाही व या बाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | परिवहन |
| **३४** | नागपूर येथील सुपर स्पेशालीटी हा ॅस्पीटलची निर्माण झालेली दयनिय अवस्था, सदर हा ॅस्पीटल करीता सुरक्षा चैकी असून ती बंद स्थितीत असून त्याचे खिडक्या व दरवाजे तुटलेले असणे, त्यातच हा ॅस्पीटल आवारात व समोर मोठया प्रमाणात कच-यांचे ढिगारे दिसून येणे, रूग्णाकरीता वापरलेला कालबाहय सिरीज व औषधी ही अस्थाव्यस्त परिसरात फेकली जाणे, सुरक्षेच्या दृष्टीने वापरण्यात येणारे अग्निशामक उपकरणे कालबाहय स्थितीत असणे, | वैद्यकीय शिक्षण |

| | | |
|---|---|---|
| | रूग्णालयाच्या आजूबाजूला झूडपी कच-याने व्याप्त असणे, त्यामूळे रूग्णालयात अस्वच्छता निर्माण झाल्याने त्याचा परिणाम रूग्णावर होणे, त्यामूळे सदर परिसरात स्वच्छता आणण्याची आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यावर त्वरीत करावयाची कारवाई व उपाययोजना. | |
| **३५** | मुंबईतील दादर येथील इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे भूमिपूजन होऊन दोन वर्ष उलटून गेली तरी अजून मिलची जमीन राज्य सरकारच्या ताब्यात आली नसणे, इंदू मिलच्या जमीनच्या हस्तांतरणचा प्रश्न प्रलंबित असणे, सदरील जमीन राज्य शासनाच्या ताब्यात नसल्याने या जमीनीवर कोणतेच बांधकाम व इतर कामे होणार नसणे, राज्यशासनाने सदरील जागा ताब्यात न घेता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतराष्ट्रीय स्मारकासाठी इंदू मिल येथे भुमिपजून केल्याच्या घटनेमुळे आंबेडकर प्रमी जनता व सर्वसामन्य जनतेची दिशाभूल करणारी असल्याने राज्यशासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, राज्यशासनाने इंदू मिलची जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या स्मारकासाठी ताब्यात घेऊन प्रस्तावित आंतरराष्ट्रीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | सामाजिक न्याय |
| **३६** | रिलायन्स कंपनीच्या दहेज (गुजरात) ते नागोठणे (रायगड, महाराष्ट्र) या इथेन वायूवहन प्रकल्पाच्या पाईपलाईनचे काम वेगाने सुरु असणे मात्र महाराष्ट्र राज्यातील स्थानिक शेतक-यांच्या विरोधाला न जुमानता पोलिसांच्या बळाचा वापर करुन शेतक-यांच्या जमिनीतून पाईपलाईन टाकली जात असल्याचा आरोप शेतक-यांनी केला असणे, दहेज ते नागोठणे अशा साडेचारशे किमी लांबीची इथेन गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम रिलायन्स कंपनीकडून सुरु असणे, यातील प्रकल्पग्रस्त शेतक-यांना अद्याप पुरेसा मोबदला मिळाला नसल्याची तक्रार शेतक-यांची असणे, या पाईपलाईन कामाच्या चौकशीसाठी भिवंडी,कल्याण,वाडा येथील शेतकरी रिलायन्स कपंनीच्या संबंधित अधिका-यांकडे गेले असता त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात येणे, ओझर्ली, रेवती येथील शेतकरी जमिनीचा मोबदला मागण्यासाठी संबंधित अधिका-यांकडे गेला असता टिटवाळा पोलीस ठाण्याचे अधिका-यांनी शेतक-यांवर कारवाई करण्याची धमकी दिल्याचा आरोप शेतक-यांकडून करण्यात येणे, राज्य शासनाने याप्रकरणी तातडीने चौकशीकडून रिलायन्स कंपनीच्या मनमानी कारभाराबाबत या कंपनीवर तातडीने कारवाई करुन शेतक-यांना जमिनीचा योग्यतो मोबदला देण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया | गृह |
| **३७** | मुंबईतील मेट्रो -३ प्रकल्पासाठी वृक्षतोडीबाबत, तोडण्यात येत असलेल्या झाडांची यादी बनविताना त्या झाडाचे वय, झाडाचा प्रकार, बुंध्याचा घेर इत्यादींची माहिती चुकीची असून जाणीवपूर्वक फेरफार केल्याचे दिसून येणे, मेट्रोचा आराखडयाप्रमाणे ५ हजार झाडे तोडण्यात येणार असून काही दिवसांत १०० हून अधिक झाडे तोडण्यात येणे, या व्रक्षतोडीला उच्च न्यायालयाने कडाडून विरोध केला असून मूंबईला महत्वाकांक्षी मेट्रो प्रकल्प रखडणार असल्याने सर्वसाधारण जनतेमध्ये पसरलेली नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन यावर उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | पर्यावरण |
| **३८** | भारतात आयात केली जाणारी औषधे,प्रसाधने किंवा त्यांच्या कच्च्या मालाच्या नमुन्यांची चाचणी करण्यासाठी अधिकृत मानल्या गेलेल्या प्रयोगशाळेत पात्र शास्त्रज्ञद्वारे अनुपस्थितीत तोतया शास्त्रज्ञद्वारे चाचण्या केल्या जात असून चाचणीशिवाय प्रमाणपत्रेही तयार केली जात असल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) यांनी मुंबईतील गोरेगावमधील पॅरा लॅब प्रा.लि. या प्रयोगशाळेत छाप्यात सदरील प्रकार उघडल्याचे माहे फेब्रुवारी-२०१७ च्यासुमारास उजेडात | अन्न आणि औषध प्रशासन |

| | | |
|---|---|---|
| | येणे, विमानतळ तसेच गोदीमध्ये समुद्रमार्गे येणारा आयात माल किंवा हवाई वा समुद्रमार्गे निर्यात होणारा माल यांच्या नमुन्यांची तपासणी करण्याचे काम काही खासगी प्रयोगशाळांकडे दिले जात असणे, त्याचप्रमाणे बाहेरच्या काही उत्पादकांना त्यांच्या उत्पादनांची चाचणी करुन घेण्याची सोयही उपलब्ध केली जात असणे, त्यासाठी त्यांना केंद्र सरकार व राज्य सरकार यांची मान्यता असेत, मुंबईत दररोज लक्षावधी औषधे-प्रसाधने यांची विक्री, वितरण होत असते काही उत्पादक खासगी प्रयोगशाळांमधून आपल्या उत्पादनांची तसेच कच्च्या मालाची तपासणी करुन घेत असल्याने सदरील प्रकारामुळे अशा प्रयोगशाळांमध्येच चाचणी,विश्लेषणात शंकास्पद प्रकार आढळल्याने सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होणे, खाजगी प्रयोगशाळेतून एफडीएच्या महत्वाच्या अटी धाब्यावर बसविल्या जात असल्याने राज्यशासनाने या प्रकरणी तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया | |
| ३९ | रेल्वे मार्गावर अडथळा आणून घातपात करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे निदर्शनास आले असून फेब्रुवारी, २०१७ च्या पहिल्या आठवडयाच्या दरम्यान पनवेल-दिवा रेल्वे मार्गावर लोखंडी तुकडा ठेवण्यात आल्याची उघडकीस आलेली घटना,दुसऱ्या दिवशी पनवेल-जेएनपीटी चा मार्गावर कोपरजवळ विजेचा खांब टाकण्यात येणे, तर त्यानंतरचा दिवा-पनवेल मार्गावर नावडे आणि कळंबोली रेल्वे स्थानकांदरम्यान रेल्वे रुळांवर जिलेटीनच्या कांडया आढळून येणे, परंतु असे प्रकार करणाऱ्या आरोपींना अद्याही अटक करण्यात न येणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन करावयाची तातडीची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया | गृह |
| ४० | मुंबईतील जी.टी. रुग्णालयात बेकायदा अस्थिव्यंग इम्प्लांट (रोपण) सामग्रीच्या धंदयाची व्याप्ती संपूर्ण राज्यात पसरलेली असून नांदेड, नाशिक, पुणे, अहमदनगर, यवतमाळ, बीड इत्यादी जिल्ह्यातही हा घोटाळा उघडकीस येणे, ग्रँट रोड येथील एका वितरकाकडे तब्बल ४० लाखांची विनापरवाना वैद्यक सामग्री जप्त करण्यात येणे, त्यामुळे अस्थिव्यंगोपचार, शस्त्रक्रियामध्ये हात, पाय, गुडघे व हात जोडणीसाठी वापरल्या जाणाऱ्या सामुग्रीच्या दर्जाबाबत व या रुग्नांना मिळणाऱ्या सेवेबाबत शंका निर्माण झालेली असून जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने सखोल चौकशी करुन याप्रकरणी दोषींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण |
| ४१ | नागपूर येथे प्रगत शैक्षणीक महाराष्ट्र कार्यक्रम अंतर्गत बी.आर.एम मुंडले या शाळेत कार्यशाळा आयोजीत केली असता सदर कार्यशाळेत नागपूर, गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील शिक्षण विभागाचे केन्द्र प्रमुखापासून ते शिक्षणाधिकारी पर्यंत शिक्षण विभागाच्या अधिका-यांना कार्यशाळेत आमंत्रित केले असता सदर कार्यशाळेला मार्गदर्शनासाठी राज्याचे शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांनी मार्गदर्शन करताना प्राथमिक वर्गामध्ये शिकणाऱ्या मुलांना भागाकार कसा करावा हे कळत नाही, हीच मुले पुढे शालांत परिक्षेला बसतात आणि दहावीत त्यांचा ८० टक्के निकाल लागतो हे कसे काय शक्य आहे? बाेर्डाचा निकाल हा खोटा असल्याची टीका कार्यशाळेत केली जाणे, राज्याच्या शिक्षण विभागाच्या एका उच्चपद अधिका-यांनेच बोर्डाच्या निकालावर एकप्रकारे शंका निर्माण केल्याने प्रश्नचिन्ह निर्माण होणे, त्यातच शिक्षकांच्या शिक्षण पध्दतीवर टिका करणे, त्यामुळे शिक्षकाचे मनोबल खचविल्या जाणे, त्यामुळे शिक्षकामध्ये व विद्यार्थ्यांमध्ये याबाबत पसरलेला असंतोष, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | शालेय शिक्षण |

| | | |
|---|---|---|
| ४२ | मुंबईतील कांदिवली पुर्व येथे ठाकूर कॉम्प्लेक्स मधून वाहणाऱ्या पोयसर नदीच्या पात्रामध्येच बांधकाम सुरु असल्याचा माहे फेब्रुवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवडयाच्या सुमारास उघडकीस आलेला प्रकार, ठाकूर कॉम्प्लेक्स येथील तिरुपती टॉवरच्या मागच्या बाजूने पोयसर नदीचा प्रवाह जात असून त्याठिकाणी भिंती तोडण्याचे आणि तिथे कॉंक्रीटीकरण करण्याचे सुरु असलेले काम, नदी पात्रात बांधकामाची परवानगी नसताना नदीच्या भिंतीचे कॉंक्रीटीकरण करण्यासोबतच नदीच्या तळाचेही कॉंक्रीटीकरण केले जात असल्याने नदीपात्रात झालेल्या या बांधकामामुळे पाणी झिरपायला जागाच उरणार नसल्यामुळे परिणामी थोडया पावसातही पाणी पात्राबाहेर येऊन स्थानिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागणार असून पर्यावरणाचीही हानी होणार असल्याने या प्रकरणी सखोल चौकशी करुन कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | नगर विकास |
| ४३ | मुंबईतील महालक्ष्मी रेसकार्सच्या भूखंडाचे नूतनीकरण रखडले असल्याची बाब उजेडात येणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत भुभाग क्र. १ जे, महालक्ष्मी प्लॅट्स मालमत्ता हा सुमारे ८,५५,१९८.७८ चौ.मीटर (१०,२२,८०६ चौ.वार) आकारमानाचा भूभाग दिनांक ०१.०६.१९१४ ते ३१.०५.२०१३ या ९९ वर्षाच्या कालावधीकरीता अश्वशर्यती आणि त्यानुषंगाने येणा-या बाबीच्या वापराकरिता मे.रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि. यांना मक्त्याने देण्यात येणे, सदर मक्ता करार दिनांक ३१.५.२०१३ रोजी संपुष्टात येणे, सदरील क्लबला मक्तात असलेली जागा ही ७० टक्के राज्य शासनाच्या मालकी असुन उर्वरित ३० टक्के भुभाग महानगरपालिकेच्या मालकी असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या गटनेत्यांच्या दिनांक १५ मे, २०१३ च्या विषय क्र.५ अन्वयेच्या ठरावान्वये रेसकोर्स असलेली जागा ही मुंबई शहराच्या महत्वाच्या ठिकाणी आहे म्हणून त्याठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे थीम पार्क विकसित करण्याची आवश्यकता असल्याबाबतचा ठराव मंजुर करण्यात येणे, मुंबईचे महापौर यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगपालिका यांना पाठविलेल्या दिनांक १५.४.२०१३ च्या पत्रान्वये या भुभागाच्या मक्त्याचे पुनश्च नुतनीकरण न करता सदर भुखंडावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे थीम पार्क विकसित करावे जेणे करुन मुंबापुरीच्या सौंदर्यात भर पडेल आणि मुंबई शहर आरोग्याच्या दृष्टिने सुदृढ राहील याकरिता सदर भुखंडावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे उद्यान विकसित करण्याची विनंती करण्यात येणे, राज्य शासनाने त्वरीत रेसकार्स जमिनीबाबत निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | नगर विकास |
| ४४ | सिंधुदुर्ग जिल्यात दोडामार्ग, सावंतवाडी भागात माकड तापाचा मोठया प्रमाणात प्रादुर्भाव होऊन माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये या तापाने दोघांचा झालेला मृत्यू, व आतापर्यंत जिल्ह्यात ५० पेक्षा जास्त रुग्ण माकडतापाने ग्रस्त असल्याचे आढळून येणे, या तापाच्या नियंत्रणासाठी प्रशासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक नागरिकांना व पर्यटकात पसरलेले तीव्र भीतीचे व चिंतेचे वातावरण याबाबत शासनाने तातडीने या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी करावयाची उपाययोजना व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण |
| ४५ | ठाणे व कल्याण तालुक्यातील मुंबई विद्यापीठाच्या उपकेंद्र उभारुन दोन वर्ष उलटल्यानंतरही अद्याप प्रशासकीय विभाग सुरु झालेला नसणे, ज्या उद्देशाने मुंबई विद्यापीठाने सदरील दोन उपकेंद्र सुरु करण्यात आली त्याचा या जिल्हयातील विद्यार्थ्यांना फायदा होत नसल्याचे समोर येणे, महापालिकेने सदरील उपकेंद्रासाठी एक रुपया नाममात्र आकारुन जागा देणे, १७ ऑगस्ट, २०१० रोजी या उपकेंद्राचे बांधकामाला सुरुवात करण्यात येऊन इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर शैक्षणिक सुविधांसह विद्यापीठाची इमारत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठी सज्ज होईल अशी विद्यार्थ्यांची अपेक्षा होती मात्र तसे घडले नसून मुंबई विद्यापीठ आणि उपकेंद्रामध्ये कोणताही समन्वय नसणे, या उपकेंद्राचा फायदा ठाणे व कल्याण आजूबाजूला असलेलया विद्यार्थ्यांना होत नसणे, | उच्च व तंत्र शिक्षण |

| | | |
|---|---|---|
| | ठाणे जिल्हयात मुंबई विद्यापीठाचे दोन उपकेंद्र उभारुनही विद्यापीठाच्या कारभारचे विकेंद्रीकरण होऊ शकलेले नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी आणि त्यातून उद्‌भवणा-या समस्यांसाठी अजूनही मुंबईला फे-या माराव्या लागत असणे, ठाणे व कल्याण तालुक्यातील मुंबई विद्यापीठाच्या दोन्ही उपकेंद्र पुर्णपणे सुरु करण्याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही करण्याची आवश्यकता तसेच सदरील उपकेंद्र सुरु करण्यास दिरंगाई करणा-या संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | |
| **४६** | मुंबई वाहतूक पोलीस विभागात कोट्यावधींचा भ्रष्टाचार होत असून प्रत्येक गुन्हयांसाठी वाहतूक पोलिसांचे दर ठरलेले आहे असा गौप्यस्फोट वाहतूक पोलीस हेडकॉन्स्टेबल सुनील टोके यांनी करण्यात येणे, वाहतूक नियंत्रण शाखेत सुरु असलेल्या गैरव्यवहार व भ्रष्टाचाराबाबत चौकशी करुन योग्य ती कारवाई करावी यासाठी गेल्या तीन वर्षापासून वरिष्ठ अधिका-यांकडे सातत्याने पुराव्यानिशी पाठपुरावा करीत असणे, भ्रष्टाचारात सामील होण्यास नकार दिल्यास वरिष्ठ अधिका-यांकडून छळ होतो असा ही आरोप सुनील टोके यांनी करणे, मुंबई वाहतूक पोलीस हेडकॉन्स्टेबल सुनील टोके यांनी केलेल्या आरोपांची शासनाने दखल घेऊन याप्रकरणी सखोल चौकशी करुन त्यानुसार वाहतूक पोलिसांमधील दोषी असणा-या पोलिसांवर कोणती कारवाई केली तसेच वाहतूक पोलिसांमधील होत असलेला भ्रष्टाचार रोखण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | गृह |
| **४७** | देशात कृषी व्यवसायनंतर वस्त्रोउद्योग हा सर्वात मोठा व्यवसाय असून देशातील एकूण वस्त्रोद्योग व्यवसायापैकी ५० टक्के व्यवसाय एकटया महाराष्ट्र राज्यात असणे, या व्यवसायातून राज्यातील सुमारे ८० लक्ष लोकांना रोजगार मिळतो तसेच या व्यवसायापासून शासनाला मोठया प्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळत असणे, राज्यातील भिंवडी, मालेगांव , इंचलकरंजी, सोलापूर,धुळे, कामठी नागपूर व कराड येथे पॉवरलुम सेंटर असणे, या शहरातील लोकांचा मुख्य व्यवसाय वस्त्रोद्योग असून शासनाचे आयात-निर्यात धोरणामुळे या व्यवसायावर मंदीचे सावट येणे, शासनाच्या आयात निर्यात धोरणामुळे या व्यवसायातील मालाचा दर स्थिर व निश्चित रहात नसणे म्हणून सदर व्यवसायातील पॉवरलुल मालकांना मोठे नुकसान सोसावे लागत असल्याने सदरील बंद होत असणे, परिणामी पॉवरलूम क्षेत्रात काम करणा-या लाखो कामगारांवर बेरोजगारीमुळे होत असलेली उपासमारी, या उद्योगाच्या विविध समस्यांकडे राज्य शासनाचे होत असलेले दुर्लक्ष त्यामुळे शासनाबाबत निर्माण झालेला तीव्र असंतोष, राज्यशासनाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन पॉवरलूम व्यवसायावरील आलेले संकट दुर करण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | वस्त्रोद्योग |
| **४८** | मुंबई मधील मध्य रेल्वेमार्गावर डीसी-एसी विद्युत प्रवाहाचे परिवर्तन करण्यात अडथळा असलेला सॅण्डहर्स्ट रोड स्थानकातील हँकॉक पूल गेल्या वर्षी १० जानेवारी रोजी विशेष ब्लॉक घेऊन पाडण्यात येणे, पण त्या जागी नवीन पूल बांधण्याचे काम मुंबई महानगरपालिकेला एका वर्षात सुरु करता आलेले नसणे, गेल्या वर्षभरात सॅण्डहर्स्ट रोड रेल्वेमार्गावर स्थानक परिसरात रेल्वे रुळ ओलांडताना १८ जणांचा मृत्यू होऊनही पालिकेला जाग आलेली नसणे, सॅण्डहर्स्ट रोड स्थानक परिसरात रेल्वे लोहमार्ग पोलिसांच्या माहितीनुसार १८ जणांचा मृत्यू बहुतांश हे हँकॉक पुलाच्या ठिकाणीच झालेले असल्याने हा पूल बांधण्यासाठीची अत्यंत निकड लक्षात येत असणे, महापालिकेने सदरील पुल बांधण्याची जबाबदारी उचलेली असून परंतू एक वर्ष होऊन सदरील पुल बांधण्याबाबत पालिका प्रशासनाकडून कोणती कार्यवाही होता दिसत नसल्याने सर्वसामन्य नागरिकांचा अजून किती नाहक बळी दिला जाणार असल्याचा सवाल केला जात असणे, १८ बळींनतरही सॅण्डहर्स्ट रोड स्थानकातील हँकॉक पूल अधांतरीत असल्याने जनमानसात शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची | नगर विकास |

| | | |
|---|---|---|
| | भावना निर्माण होणे, राज्यशासनाने याप्रकरणी दखल घेऊन सॅण्डहर्स्ट रोड रेल्वेमार्गावर स्थानकात नव्या पुलाची उभारणी करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | |
| ४९ | सातत्याने होणारे नुकसान आणि गडगडलेले भाव यांचा ताळमेळ बसत नसल्याने वैतागलेल्या नाशिक जिल्हयातील येवला तालुक्यातील नगरसूल येथली एका शेतक-याने पाच एकरमधील पिकलेल्या कांदा शेताला आग लावून शेतक-यांनी शासनाच्या विरोधात निषेध दर्शविल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्यासुमारास उजेडात येणे, लासलगाव बाजारात कांद्याच्या भावात घसरण सुरु असून क्विंटलमागे ४५० रुपयांपर्यंत भाव खाली येणे, नोटाबंदीमुळे उत्पादकांना याची अगोदरच झळ सोसावी लागत असणे, रेल्वे वॅगन उपलब्ध होत नसल्याने कांद्याला उठाव मिळत नसणे, उस्मानाबाद जिल्हयातील एका शेतक-यांनी हमीभाव खरेदी केंद्रावर तुर विकून स्वत:च्या कष्टाचे पैसे सरकार देत नसणे, व्यापा-यांना विकली असती तर लिलाव होऊन २४ तासात पैसे मिळाले असते परंतू सरकारला तरू डाळ विकून फसलो असल्याची भावना शेतक-याच्या मनात निर्माण होणे, सरकारी केंद्रामध्ये तूर विकणा-या अर्ध्याहून अधिक शेतक-यांना पैसे मिळालेले नसणे, पिक पिकूनदेखील वेळेवर पैसे मिळत नसल्याने शेतकरी वैतागलेले असणे, यंदा पाऊस चांगला झाल्याने कांदा व तुरडाळ यांची आवक वाढली असून शेतक-यांना शेतीला शासनाकडून योग्य हमीभाव देत नसणे, शेतक-यांच्या पिकांना हमीभाव देण्याबाबत शासनाचे उदासिन धोरण राबवित असल्याने शेतकरी आपले कष्टाची कमाईचे पिकलेले शेताला आग लावून शासनाच्या विरोधात निषेध व्यक्त करीत असणे, राज्य सरकारच्या सदरील उदासीन धोरणामुळे ग्रामीण भागातून शासनाबाबत तीव्र संताप व्यक्त करण्यात येणे, राज्यशासनाने ग्रामीण भागातील शेतक-यांना दिलासा देण्याबाबत कांदा, तूर डाळ शेतीला जास्तीतजास्त हमीभाव देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | कृषी |
| ५० | ठाणे मनपा सेवेअंतर्गत महानगरपालिकेस जवळपास एक हजार बसेसची आवश्यकता असणे, तथापि सद्यस्थितीत ४७० बसेस असून केवळ १३० बसेसच सुस्थितीत असून उर्वरित बसेस दुरुस्तीअभावी बंद असल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी निदर्शनास येणे, बंद पडलेल्या बसेससाठी लागणाऱ्या साधन सामुग्री खरेदी प्रक्रियेत होणारे आर्थिक घोटाळे, अवाजवी खर्च, व JNNURM अंतर्गत प्राप्त झालेल्या बसेस जुन्या मॉडेलचे असल्याचे निदर्शनास येणे, तसेच सदर बसेसमध्ये वापरलेले टायर्स व बॅटऱ्या या दोन-एक वर्षे जुन्या असून त्यावर सन २०१५ हे वर्ष नमूद करण्यात आल्याचे परिवहन समिती सदस्यांना केलेल्या तपासअंती दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ रोजी निदर्शनास येणे, इतकेच नव्हेतर नवी मुंबई महानगरपालिकेसाठी परिवहन सेवेचा ठेका घेणाऱ्या ठेकेदाराने मिडी बसेसकरिता रुपये ३७/- प्रति किमी तर स्टँडर्ड बसेसचा दर रुपये ४७/- प्रति किमी आहे परंतु ठाणे मनपातील परिवहन सेवेच्या ठेकेदाराने मिडी बसेसकरिता रुपये ५२/- व स्टँडर्ड बसकरिता ६६/- प्रति किमी असा दर दिल्याचे आढळून येणे, त्यामुळे ठाणे मनपा प्रति दिन रुपये ५.४७ लाख सदर ठेकेदारास अधिक द्यावे लागून सदर कामाचार ठेका १० वर्षाचा असल्याने १० वर्षात रुपये २०० कोटी अधिक सदर ठेकेदारास द्यावे लागणार असल्याने, तरी सकृतदर्शनी याप्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये निदर्शनास येणे, याशिवाय परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांची थकित देणी देखील प्रलंबित असणे, त्यामुळे यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याबाबत महाराष्ट्र लेबर एकता युनियनकडून तसेच ठाणे येथील सामाजिक कार्यकर्ते व प्रवासी संघटनांकडून गेल्या अनेक वर्षापासून ते आजतागायत वारंवार मागणी करण्यात येणे, तथापि त्याकडे शासनाकडून | नगर विकास |

| | | |
|---|---|---|
| | जाणिवपूर्वक करण्यात येणारे दुर्लक्ष, परिणामी ठाणेवासिय व सर्वसामान्य प्रवासी जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, सबब, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भूमिका. | |
| **५१** | मुंबईचे आद्य शिल्पकार जगन्नाथ ऊर्फ नाना शंकर शेठ यांच्या स्मारकाचे भूमिपूजन दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजल वडाळा येथे करण्यात येऊनही दीड वर्षात या स्मारकाबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या दरम्यान निदर्शनास येणे, या स्मारकासाठी अंदाजे २५ कोटी आवश्यकता असताना राज्य शासनाने व मुंबई महापालिकेने एका रुपयाची तरतूद न केल्याने निधीअभावी या स्मारकाचे काम रखडलेले असणे, राज्य शासनाने निवडणुकीच्या आश्वासन देऊनही दीड वर्षात काळात आश्वासनाची पूर्तता करण्यात न आल्याने मुंबईच्या जनतेमध्ये परसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने निधीची तरतूद करुन नाना शंकरशेठ यांचे स्मारकाचे काम त्वरीत पूर्ण करण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | सांस्कृतिक कार्य |
| **५२** | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका सभागृहाचे नेते मनोज म्हात्रे यांच्यावर गोळीबार करीत तलवार, कोयत्याने हात-पाय तोडून त्यांची निघृण हत्या केल्याची घटना दि. १५.२.२०१७ रोजी घडणे, मनोज म्हात्रे हे ओसवालवाडी येथील त्यांच्या घरी जात असताना इमारतीच्या आवारात दबा धरुन बसलेल्या सात-आठ मारेक-यांने बेछुट गोळीबार करीत तलावर, कोत्याने त्यांच्यावर असंख्य वार करुन पसार झाले, रक्ताच्या थारोळयात कोसळलेल्या म्हात्रे यांना तातडीने ठाण्याच्या ज्युपिटर रुगणालयात हलविण्यात आले मात्र उपचारापूर्वी मृत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले, या हत्येचा थरार सीसीटीव्हीत कैद होणे, सदरील घटनेमुळे भिवंडी परिसरातील जनतेमध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण निर्माण होणे, सदरील घटनेतील आरोपींना अटक करण्यात न आल्याने नागरिकांनी भिवंडीमध्ये रस्ता रोखो करुन शासनाच्या विरुध्द निषेध व्यक्त करण्यात येणे, राज्यशासनाने सदरील घटनेची सखोल चौकशी करुन तातडीने या प्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया | गृह |
| **५३** | राज्यात सातबाराच्या नोंदीसाठी तांत्रिक पाठबळाचा अभाव आणि कर्मचाऱ्यांना पुरेसे तांत्रिक ज्ञान नसल्याने सातबाराच्या ऑनलाईन नोंदी रखडल्या असणे, व बहुतांशी तलाठयांना ही यंत्रणा हाताळतानाही अनेक अडचणी येत असणे, संपूर्ण राज्यातून एकाच वेळी तलाठी लॉग इन करीत असल्याने सर्व्हरवर ताण येऊ लागल्याने ही यंत्रणा कोलमडणे, शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीच्या प्रत्येक कामासाठी सातबाराच्या अद्ययावत उताऱ्याची गरज भासते, तो तात्काळ मिळत नसल्याने त्यांची अडचण येत असणे, ६ महिन्यांपासून अनेक प्रस्ताव प्रलंबित असणे, जमिनी खरेदी विक्रीला ऑनलाईन सातबारा मिळत नसल्याने खरेदीची विक्री नोंद होत नसल्याने शासनाला त्यांचे रुपयांचा महसूल जमवून देण्याच्या खरेदीत -विक्री होत नसणे व सर्व सामान्य जनतेला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना व याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन सातबारासाठी असलेली ऑनलाईन प्रक्रिया त्वरीत सुधारण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | महसूल |
| **५४** | शासनाकडून १९१३ साली ९९ वर्षाच्या कराराने ऋषिकेश मफतलाल यांच्या मफतलाल इंडस्ट्रीजने अटी व शर्तीवर घेतलेला भायखळा मुंबई येथील भूखंड, या कंपनीने बिल्डर्स बिल्डकॉन एलएलपी ला २०११ साली ६०५ कोटी रूपयांना हस्तांतरीत केल्यानंतर शासनाच्या संमती शिवाय भूखंडाच्या विकासाचे हक्क परस्पर अन्य व्यक्ती वा संस्थेला विकल्याबद्दल १५/१०/२०१२ साली जिल्हाधिकारी यांनी मफतलाल इंडस्ट्रीला ४५४ कोटी रूपये शासनाला देणेबाबत | महसूल |

| | | |
|---|---|---|
| | पाठविलेली नोटीस, अद्यापी शासनाच्या नोटीशीची कोणतीही दखल सदर कंपनीने न घेणे, मफतलाल कंपनीने महाराष्ट्र जमीन महसूल संहीतेच्या २९५ व्या कलमाचा केलेला भंग, त्यामुळे बाजारभावाप्रमाणे भाडे आणि मुद्रांक शुल्क घेण्याचा सरकारला असलेला अधिकार, त्याला अनुसरून जिल्हाधिकारी यांनी बिल्डर्स बिल्डकॉनला मफतलाल इंडस्ट्री ४५४ कोटी रूपये शासनाला अदा करेपर्यंत त्यांचा या भूखंडावर हक्क राहणार नाही अशी नोटीस पाठविल्याचे नोव्हेंबर २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास उघडकीस येणे, स्प्रींग ऍण्ड व्हिव्हिंग कंपनी सध्याची मफतलाल या कंपनीने या भूखंडापैकी काही भाग राणीच्या बागेच्या विस्तारासाठी दिल्यानंतर शासनाने लीजचे नुतनीकरण करणे, त्या नुतणीकरणाच्या वेळेस सदर कंपनीला घालण्यात आलेल्या व त्यांनी मान्य केलेल्या अटींची पुर्तता न करता भागधारकांची दिशाभूल करून मफतलाल कंपनीने बिल्डर्स बिल्डकॉनला अनधिकृतरित्या जमिनीचे केलेले हस्तांतरण, मफतलाल इंडस्ट्रीने शासनाच्या भूखंडाच्या व्यवहारातून नफा मिळविला असून अनअर्न्ड इन्कम शासनाच्या तिजोरीत न भरता त्याचा केलेला दुरूप्रयोग व गैरव्यवहार, सदर भूखंडाचे हस्तांतरण करताना वा त्याच्या दस्तऐवजाची नोंदणी करून योग्य तो कर भरताना शासनाच्या दस्तऐवज नोंदणी अधिकाऱ्यांनी त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे या हस्तांतरणास कोणत्याही प्रकारची संमती न देता संबंधीत कंपनीकडून त्यांना नोटीशीद्वारे ठोठविलेला दंड वा अदा करण्यास सांगितलेली रक्कम वसूल करण्यात यावी व गेली तीन-चार वर्षे सदर कंपनी शासनाच्या आदेशाकडे हेतूतः दूर्लक्ष करीत असून सुध्दा शासन संबंधित कंपनी विरूध्द कारवाई करीत नसल्यामुळे निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | |
| **५५** | कोकण विभागीय आयुक्त यांनी मनोर-वाडा-भिवंडी रस्त्याचे ठेकेदार सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर यांनी ७ लाख ५० हजार ब्रास गौण खनिजाच्या स्वामित्व धनाची २९ कोटी इतकी रक्कम शासनाला न देता त्याचा अपहार केल्याबाबतच्या तक्रारीची पूर्ण चौकशी करून सदर कंपनी दोषी आढळल्याने कंपनी व ठेकेदारांकडून पाचपटीच्या दंडासह रक्कम वसूल करावी असे पत्र पालघर व ठाणे जिल्हाधिकारी यांना ऑगस्ट २०१६ मध्ये पाठवूनही अद्यापी या कंपनीने वा ठेकेदाराने मुळ रक्कमेसह दंडाचा भरणा शासनाकडे केला नसल्याची बाब उघडकीस येणे, सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने ७ लाख ५० हजार ब्रास गौण खनिजाचे उत्खनन करेपर्यंत त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याविरूध्द कोणतीही कारवाई करण्यात न येणे, तसेच सदर सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने दरमहा गौण खनिजाच्या स्वामीत्व धनाची रक्कम शासनाला जमा करणे अपेक्षित असतानाही, सदर कंपनीने ती न केल्याने शासनाच्या महसूल बुडविण्याची या कंपनीची तयारी असल्याचे उघडकीस येणे, कोकण विभागीय आयुक्तांनी के◌ेलेल्या चौकशीमध्ये सदर कंपनी दोषी आढळुन येऊनही त्यांचेविरोधात पाचपटीच्या दंडासह रक्कम वसूल करण्याचे आदेश देऊनही अद्यापी त्याची कार्यवाही न झाल्यामुळे महसूल व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांचे व या कंपनीचे आर्थिक हितसंबंध असल्यामुळे हे दोघेही संगनमताने शासलाचा महसूल हेतूतः बुडवित असल्याचे उघडकीस येऊनही त्यांचेविराधात कारवाई करण्यात न आल्याने ठाणे जिल्ह्यातील कोट्यावधी जनतेच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | महसूल |
| **५६** | मिरा-भाईंदर येथील बांधकाम व्यवसायिक श्यामसुंदर अग्रवाल व मुरलीधर अग्रवाल यांचेविरोधात ठाणे नगर पोलीस ठाण्यात मिनल गांधी यांनी केलेल्या तक्रारीनुसार शासनाच्या कमाल जमीन कायदा अंतर्गत जमीनीच बनावट कागदपत्रे तयार करून त्याद्वारे शासनाची १० ते १२ कोटी रूपयांची फसवणूक | महसूल |

| | | |
|---|---|---|
| | केल्याप्रकरणी ठाणे पोलीसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने श्यामसुंदर अग्रवाल व मुरलीधर अग्रवाल यांना अटक केल्याची बाब उघडकीस येणे, या प्रकरणी ठोण जिल्हाधिकारी कार्यालयातील काही अधिकार्‍यांच्या मदतीने यूएलसीचे बनावट प्रमाणपत्र तयार करून मिरा-भाईंदर म.न.पा. कडून बेकायदेशीररित्या बांधकाम परवानगी मिळविणे, जिल्हाधिकारी कार्यालय व म.न.पा.तील अधिकार्‍यांनी या प्रमाणपत्राची सत्यता वेळीच न तपासल्याने तसेच वास्तृविशारद व शासकीय अधिकार्‍यांनी या विकासकाला बेकायदेशीर कागदपत्रे तयार करण्यास केलेले सहकार्य, तरीही त्यांचेविरोधात पोलीसांनी कोणतीच कारवाई न करता फक्त विकासकावर कारवाई केल्यामुळे पोलीसांच्या भूमिकेबद्दल निर्माण झालेली शंका, जप्त केलेल्या कागदपत्रांबद्दल श्यामसुंदर अग्रवाल व मुरलीधर अग्रवाल हे पोलीस तपासात सहकार्य करीत नसतानाही त्यांचेविरूध्द तसेच संबंधित दोषी शासकीय व वास्तूविशारद यांचेविरूध्द कोणतीच ठोस कार्यवाही करण्यात न आल्यामुळे एकूणच या कार्यवाहीबद्दल जनतेच्या मनात निर्माण झालेला संभ्रम, बोगस कागदपत्रांच्या आधारे बेकायदेशीर मिळविलेला जागेचा ताबा ठाणे जिल्हाधिकारी यांनी तातडीने घेण्याबाबत कारवाईस विलंब होत असल्याने नागरिकांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | |
| **५७** | प्रिव्हिलेज इंडस्ट्रीज लि.मु.पो.लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा या कंपनीने पॅकेज स्कीम ऑफ इंसेन्टीव २००७ च्या अंतर्गत चुकीची माहिती देऊन केंद्र व राज्य शासनाची कोट्यावधी रूपयांची फसवणूक केल्याची बाब उघडकीस येणे, राज्य शासनाने सदर स्कीम राज्यातील उद्योग वाढीकरता आणणे, पी.एस.आय.१७०७/(सी.आर-५०)/इंडिया-८ नुसार अनुक्रमांक ३,२ मधील दिलेल्या माहिती व संदर्भानुसार व अटीशर्ती अंतर्गत मोठे उद्योग हे विक्रीकर रकमेच्या १०० टक्के सुटीसाठी पात्र असणे, या योजनेद्वारे सदर कंपनीने शासन नियम व अटीची पुर्तता न करता दिशाभूल करणारी खोटी माहिती देऊन या योजनेचे अनेक लाभ घेतल्याचे उघडकीस येणे, प्रिव्हिलेज इंडस्ट्रीज लि. यांची एक ब्रेव्हरी व एक धान्य आधारीत आसवणी असे दोन वेगवेगळे प्रकल्प वेगवेगळ्या प्लॉट वर असून त्यांचे कम्पाऊंडसुध्दा वेगळे असणे, सन-२०१३-१४ च्या केंद्र शासनाच्या कंपनी लॉ बोर्ड एमसीए २१ वर या प्रकल्पाची गुंतवणूक २०४.२३ कोटी इतकी असणे, सदर कंपनीमध्ये नियमानुसार ५०० कामगार कामावर नसणे, ईत्यादी अनेक प्रकारे राज्य व केंद्र शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून शासनास चुकीच व खोटी माहिती देऊन मिळणार्‍या १०० टक्के विक्रीवर परतावाचा फायदा सदर कंपनी घेत असणे, मिळणारा फायदा विदेशी दारू उत्पादक कंपन्या असलेल्या घटकांना पास करून कामगार व शेतकर्‍यांना नियमाप्रमाणे मोबदला देण्यात न येणे, सरकारच्या आधारित किमतीनुसार शेतकर्‍यांना भाव न देता त्यांची ही कंपनी करीत असलेली आर्थिक फसवणूक, या कंपनीने पॅकेज स्कीम ऑफ इंन्सेंन्टीव २००७ अंतर्गत शासनाची फसवणूक करून आत्तापर्यंत बेकायदेशीरपणे कोट्यावधी रूपयांचा नफा कमविल्याचे उघडकीस येऊनही, शासनाने त्यांचेविरोधात कोणतीच कारवाई न केल्याने औद्योगिक क्षेत्रात शासनाच्या या नाकर्तेपणाबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड व संपात, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना | उद्योग |
| **५८** | राज्यातील छोटया ४८ बंदरांच्या सुरक्षा व्यवस्थेकडे होत असलेले दुर्लक्ष, दहशतवाद्यांकडून या मार्गाचा भविष्यात वापर केला जाण्याची असलेली शक्यता, सदर ४८ छोटया बंदरांची सुरक्षा व्यवस्था महाराष्ट्र मेरीटाईम मंडळाकडे असणे, या छोटया बंदरांचा अतिरेक्यांकडून वापर होण्याची शक्यता असल्याचा अहवाल गुप्तचर यंत्रणेने दिलेला असतानाही या बंदरांच्या सुरक्षा व्यवस्थेकडे आवश्यक ते लक्ष पुरविण्यात आलेले नसणे, याशिवाय ४४१ लॅण्डिंग पॉईंटची पोलीस, नौदल आणि तटरक्षक दलाने संयुक्त पहाणी केली असता या ठिकाणी तात्काळ सीसीटीव्ही, थर्मल कॅमेरा बसविणे आवश्यक असल्याचे दिसून | गृह |

| | | |
|---|---|---|
| | आलेले असणे, तसेच १२८ लँडिंग पॉईंटही सुरक्षेविना असल्याचे त्यांना दिसून आलेले असणे, याबाबत संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय साधून परिणामकारक उपाययोजना करण्याची आवश्यकता असतानाही त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, यामुळे निर्माण होणारी गंभीर परिस्थिती, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. | |
| **५९** | कल्याण - डोंबिवली शहराच्या सेक्टर-१ च्या मंजूर विकास योजनेमध्ये स.नं १ हि.नं १ पै.क्षेत्र १०५२४.२२ चौ.मी क्षेत्र आ.क २० कम्युनिटी सेंटर करिता आरक्षित असणे, उक्त चौरस मिटर क्षेत्रापैकी ५२६२.११ चौ.मी क्षेत्र संबंधित जमिन मालक महानगरपालिकेस विनामुल्य हस्तांतरित करणार असल्याने उर्वरित क्षेत्र ५२६२.११ चौ.मी क्षेत्र कलम ५० अन्वये आरक्षणातून वगळण्याचा ठराव पारित होणे, ५२६२.११ चौ.मी क्षेत्र महानगरपालिकेच्या नावे असल्याबाबत ७/१२ मध्ये नमुद असणे, उक्त आरक्षण वगळण्यात आलेल्या ५२६२.११ चौ.मी क्षेत्रावर सन १९८० च्या मंजूर विकास योजनेमधील आ.क. २० कम्युनिटी सेंटर, व सन २००५ च्या मंजूर विकास योजनेनुसार आ.क. २७ आर्ट गॅलरी व म्युझियम आरक्षित असून सदर आरक्षण बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर विकसित करण्यास महानगरपालिकेच्या सभेने मंजूर देऊन भूखंड विकसित करण्याकरिता मे.धनश्री डेव्हलपर्स यांच्याबरोबर करारनामा करणे, उक्त डेव्हलपर्सला दि.२६/०५/२००९ रोजी महापालिकेने आयओडी प्रदान करणे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने सदर भूखंडाचा बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर विकास करावयाचा असल्याने सदर आरक्षित जागेवर आर्ट गॅलरी अधिक दुकान केंद असा वापर प्रस्तावित असल्याने सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरिता पाठविण्यात येणे, विकासकाने दि २८/५/२०१५ रोजी शासनास पत्रव्यवहार करुन आ.क.२० कॅम्युनिटी सेंटर याकरिता आर्ट गॅलरी व दुकान केंद्र असा वापर प्रस्तावित करून महानगरपालिकेने असलेल्या अधिकारात १५ टक्के चटई क्षेत्र निर्देशांक दिला असणे व उर्वरित ८५ टक्के चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेने शासनाकडे दि २/६/२०१२ रोजी सादर केलेला असल्याने उपरोक्त राहिलेला चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात यावा ची केलेली मागणी, दि.३/९/२००५ रोजी मंजूर झालेल्या सेक्टर-१ च्या मंजूर विकास योजनेमध्ये आ.क.२० आर्ट गॅलरी व म्युझियम हे आरक्षण स नं १/१ पै मौ.कल्याण या जमिनीवर प्रस्तावित असतांना मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ६९( ा ा) मधील तरतुदीनुसार आर्ट गॅलरी अधिक दुकान केंद्र हा वापर करण्याकरिता महानगरपालिकेने शासनाची मागितलेली परवानगी, तसेच विकासकांने ८५ टक्के चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्यास शासनाकडे मागितलेली परवानगी, महानगरपालिकेने आर्ट गॅलरी व म्युझियम आरक्षण असतांना दुकान केंद आरक्षण प्रस्तावित करतेवेळी एमआरटीपी ॲक्ट १९६६ च्या कलम ३७ (१) ची अंमलबजावणी न करणे, आ.क २० आर्ट गॅलरी व म्युझियम या आरक्षणात आर्ट गॅलरीसह प्रस्तावित केलेला दुकान केंद्र हा वापर मुळ आरक्षित वापराशी सुसगंत स्वरूपाचा नसल्याने याबाबत सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, उक्त आरक्षणाची चौकशी करून शासनाची दिशाभूल करणा-या संबंधित दोषी व्यक्तीवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका . | नगर विकास |
| **६०** | राज्यातील कुपोषण रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यास शासन अपयशी ठरत असणे, शासनाकडून कुपोषणाच्या मुळ प्रश्नाला हात न घालता आतापर्यंत केवळ वरवरच्या उपाययोजना करण्यात येणे, यातून कुपोषणाच्या प्रश्नाबाबत राज्य सरकार असंवेदनशील असल्याचे दिसून येणे, आदिवासी कुटूंबातील मुलांच्या कुपोषणाला सरकारची अनास्था जबाबदार असल्याबाबत उच्च न्यायालयाने शासनावर ताशेरे ओढले असणे, मुंबईत कुपोषणामुळे | सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण |

| | | |
|---|---|---|
| | बालमृत्यू होत असल्याने मुंबईत अशी परिस्थिती असले तर राज्यातील दुर्गम भागात काय परिस्थिती असेल असा प्रश्न निर्माण होणे, कुपोषण रोखण्यासाठी शासनाकडून मोठया प्रमाणात निधी उपलब्ध देऊनही कुपोषणाचा प्रश्न सोडविण्यास राज्यशासनाला येत असलेले अपयश, सदरील निधी कुठे जातो हाही प्रश्न उपस्थित केला जात असणे, कुपोषण रोखण्यासाठी अधिकरी व कर्मचा-यांची नियुक्ती करण्याबाबत शासन उदासिन असल्याचे दिसून येणे, कुपोषणाचा गंभीर प्रश्न सोडविण्यास शासन कोणताचा बदल करीत नसणे, शासनाबाबत जनमानसात तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, राज्यशासनाने कुपोषणांचा गंभीर प्रश्न सोडविण्याबात तातडीने करावयाची ठोस कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. | |
| **६१** | पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील कामे अतिशय निकृष्ट दर्जाची झालेली असणे, अनेक ठिकाणी खराब झालेल्या रस्त्यांमुळे वाहतुकीवर होत असलेला विपरित परिणाम, अनेकवेळा झालेले अपघात, अलिकडे दि.२१ जानेवारी,२०१७ च्या सुमारास या महामार्गावर इंदापूर जवळ सरडेवाडी टोलनाक्याच्या अलिकडे हॉटेल राऊतजवळ लक्झरी बस उलटी होऊन झालेल्या भीषण अपघातात चार जणांचा झालेला मृत्यू, अनेकजण गंभीररित्या जखमी झालेले असणे, या मार्गावरील अनेक कामे अपूर्ण असतानाही तेथे टोल आकारला जात असणे, या सर्व बाबींची त्वरीत चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, अपघातातील मृत व्यक्तींच्या कुटूंबियांना व जखमी व्यक्तींना मदत देण्याची गरज, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कारवाई. | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) |
| **६२** | गडचिरोली येथील (जि. गडचिरोली) साळवे नर्सिंग महाविद्यालयाच्या संस्थापक हे तेथील विद्यार्थीनींशी नेहमीच गैरवर्तणूक करतात असा त्यांच्यावर गंभीर आरोप करत त्यांच्याविरुध्द कारवाई करावी, अशी मागणी बी.एस्सी नर्सींग प्रथम वर्षाच्या विद्यार्थीनींनी दि. १९ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रपरिषदेत करणे, यासंदर्भातील निवेदन तेथील विद्यार्थीनींनी जिल्हाधिकारी, गडचिरोली व संबंधीत पोलिस अधिकाऱ्यांना देणे, बी.एस्सी नर्सिंग द्वितीय वर्षाचा निकाल लागून १२ विद्यार्थीनींपैकी ६ विद्यार्थीनींना शून्य गूण देऊन अनुत्तीर्ण करण्यात येणे तर ६ विद्यार्थीनींचा निकाल हेतुपूस्कर रोखून ठेवण्यात येणे, वसतीगृहात देण्यात येणारे अन्न निकृष्ठ दर्जाचे असून इतर सोयी सुविधा सूध्दा विद्यार्थीनींना पुरविण्यात न येणे, त्यामुळे अन्य कॉलेजमध्ये प्रवेश देण्यात यावा, अशी मागणी करुन विद्यार्थीनींनी संस्था चालकाविरुध्द कारवाई करण्याची केलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. | वैद्यकीय शिक्षण |
| **६३** | पालघर जिल्ह्याच्या डहाणू तालुक्यातील जिल्हापरिषदेच्या शिलोंडा प्राथमिक शाळेतील ३१ विद्यार्थ्यांना दिनांक ११ फेब्रुवारी, २०१७ रोजी सकाळच्या नास्त्यातून झालेली विषबाधा, त्यांची प्रकृती चिंताजनक असणे, या प्रकाराची माहिती मुख्याद्यापकांनी स्थानिक शिक्षण विभागाला दिलेली असतानाही याबाबत लक्ष घालण्यास झालेली दिरंगाई, या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन उपाययोजना व विद्यार्थी व विद्यार्थ्यांच्या पालकांना मदत करण्याची आवश्यकता असतानाही, डहाणू पंचायत समिती, पालघर जिल्हापरिषद जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांचे याकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | ग्रामविकास |
| **६४** | रत्नागिरी, सातारा, सांगली आणि कोल्हापूर या चार जिल्हयांतील १८० गावांचा समावेश असलेल्या सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची निर्मिती होऊन आठ वर्षे उलटली असली तर गेल्या काही वर्षात विविध कारणांनी २८ बिबटयांच्या मृत्यू झाल्याची माहिती उघड होणे, यामुळे वन्य जीवांचा संरक्षणाचा मुद्दा पुन्हा | वने |

| | | |
|---|---|---|
| | ऐरणीवर आला असून वन विभागाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत राज्य शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया | |
| **६५** | नागपूर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील रक्तपेढी २४ तास सुरु ठेवण्याच्या निर्णयाच्या अंमलबजावणीला महिना उलटत नाही तोच डागडुजीच्या नावाखाली ही रक्तपेढी बंद करण्यात आली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये उघडकीस आलेली असणे, सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हृदय, पोटाचे विकास, मेंदू आणि मूत्रपिंड प्रत्यारोपणासारख्या जोखमीच्या शस्त्रक्रियांमध्ये वाढ झालेली असणे, रुग्णांच्या आवश्यकतेला लक्षात घेता या रुग्णालयातील रक्तपेढी २४ तास सुरु ठेवण्यात निर्देश वैद्यकीय शिक्षणमंत्री महोदयांनी दिलेले असूनही रुग्णालय प्रशासनाने डागडुजीच्या नावाखाली रक्तपेढी बंद केलेली असणे, सुपर स्पेशालिटी रुग्णालयाला रोज किमान आठ ते दहा रक्त पिशव्यांची गरज असणे, रक्तपेढी बंद ठेवल्याने रक्ताअभावी अनेक रुग्ण तसेच त्यांच्या नातेवाईकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, परिणामी त्यांच्यात पसरलेला स्वरुपाचा असंतोष व संतापाचे वातावरण, सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील रक्तपेढी तात्काळ सुरु करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका.असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये उघडकीस आलेली असणे, सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हृदय, पोटाचे विकास, मेंदू आणि मूत्रपिंड प्रत्यारोपणासारख्या जोखमीच्या शस्त्रक्रियांमध्ये वाढ झालेली असणे, रुग्णांच्या आवश्यकतेला लक्षात घेता या रुग्णालयातील रक्तपेढी २४ तास सुरु ठेवण्यात निर्देश वैद्यकीय शिक्षणमंत्री महोदयांनी दिलेले असूनही रुग्णालय प्रशासनाने डागडुजीच्या नावाखाली रक्तपेढी बंद केलेली असणे, सुपर स्पेशालिटी रुग्णालयाला रोज किमान आठ ते दहा रक्त पिशव्यांची गरज असणे, रक्तपेढी बंद ठेवल्याने रक्ताअभावी अनेक रुग्ण तसेच त्यांच्या नातेवाईकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, परिणामी त्यांच्यात पसरलेला स्वरुपाचा असंतोष व संतापाचे वातावरण, सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील रक्तपेढी तात्काळ सुरु करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका. | सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण |
| **६६** | अंबड (नाशिक) पोलिस स्टेशन येथे नेमणुकीस असलेले पोलिस हवालदार भाऊसाहेब यशवंत सोनवणे यांनी ते ऑन ड्युटी असतांना पोलिस स्टेशन मधील नविन बॅरेकमध्ये दिनांक : १ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास गळफास घेऊन आत्महत्या करणे, नाशिक महानगरात व पोलिस विभागात त्यामुळे प्रचंड खळबळ उडणे, श्री.सोनवणे यांनी अंबड पोलीस ठाण्याचे पोलिस निरिक्षक यांचे जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याचा संशय मृताचे मित्र परिवार नातेवाईक व कुटूंबियांनी व्यक्त करणे, मृत सोनवणे यांनी विविध ॲथॅलेटिक्स स्पर्धांमध्ये नाशिक पोलिसांच्यावतीने प्रतिनिधीत्व केलेले असणे, उत्तम क्रिकेटपटू, खिलाडूवृत्ती, सुस्वभावी आणि आयुष्याबाबत सकारात्मक दृष्टीकोण ठेवणारे श्री.सोनवणे हे आत्महत्या करणे शक्यच नाही, असा ठाम विश्वास नातेवाईक कुटूंबिय व मित्र परिवाराने दर्शविणे व त्यांचे मृत्युबाबत घातपाताचा संशय व्यक्त करणे, श्री.सोनवणे यांनी मृत्युपूर्व लिहलेल्या चिठ्ठीत साहेबांचे नांवाचा उल्लेख असणे, त्यामुळे कै.सोनवणे यांच्या आत्महत्येप्रकरणी वरिष्ठ विभागामार्फत तपास करण्याची संबंधितांकडून मागणी केली जाणे, घटना होऊन सात महिन्याचा मोठा कालावधी झालेपश्चात अद्याप चौकशी/तपास न होणे वा चौकशीचे निष्कर्ष संबंधितांचे नातेवाईक, जनतेसमोर आले नसल्याचे सांगण्यात येऊन याविषयी नाराजी व्यक्त केली जाणे, त्यामुळे ह्या संशयास्पद मृत्यु/आत्महत्याप्रकरणी तात्काळ सखोल चौकशी करण्याची गरज, याबाबत शासनाने केलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. | गृह |

| | | |
|---|---|---|
| ६७ | सांडपाणी सोडताना कोणत्याही प्रकारची प्रक्रीया न केल्याने उल्हास नदी प्रदूषित झाल्याचा ठपका ठेवत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, कुळगाव-बदलापूर नगरपालिका यांसह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना दोषी ठरवित सामुदायिकरित्या १०० कोटी रुपयांचा दंड हरित लवादाने ठोठावलेला असणे, संबंधितांनी दंडात्मक कारवाईला सामोरे जाण्यापूर्वीच व आवश्यक त्या उपाययोजना करण्यापूर्वीच मुख्य सचिवांनी शासनामार्फत माहे डिसेंबर, २०१६ च्या शेवटच्या आठवडयाच्या सुमारास सादर केलेले प्रतिज्ञापत्र, त्यामुळे दोषी ठरविलेल्या यंत्रणांना हरित लवादाकडून मिळालेला दिलासा, मुख्य सचिवांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रामुळे याप्रकरणातील दोषींना मिळत असलेले संरक्षण, परिणामी उल्हास नदीसहअन्य नद्यांतील प्रदूषण करणा-यांवर वचक न राहण्याची निर्माण झालेली शक्यता, त्यामुळे मुख्य सचिवांनी प्रतिज्ञापत्र सादर करण्याची कारणे स्पष्ट होण्याची गरज, उल्हास नदी प्रदूषित झाल्यामुळे त्याबाबत उपाययोजना करण्याची गरज, तसेच राज्यात इतर ठिकाणी नद्या प्रदूषित होऊ नयेत यासाठी दक्षता घेण्याची आवश्यकता व यावर शासनाची प्रतिक्रिया. | पर्यावरण |
| ६८ | पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात अभाविप आणि स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडीया 'एसएफआय' या संघटनांच्या कार्यकर्त्यांत जोरदार हाणामारी झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्यासुमारास उजेडात येणे, आ ैपरिचारक यांच्या सैनिकांविषयक वक्तव्याच्या निषेधावरुन सदरील वाद निर्माण होणे, औरंगाबाद मध्ये पंधरा दिवसापूर्वी असाच प्रकार घडला होता तेथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठात पं.दीनद्याळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्ताने आयोजित कार्यक्रमावरुन बहुजन व भाजपायुमो यांच्यात निर्माण झालेल्या वादाचे रुपांतर तोडफोड आणि मारामारी झाल्याचा प्रकार घडणे, राज्यातील विदयापीठ व कॉलेज मध्ये विदयार्थी दोन संघटनेत हाणामारीचे प्रकारात वाढ होणे, राज्यशासनाला विदयार्थ्यांच्या होणा-या जोरदार हाणामारी रोखण्यास व उपाययोजना करण्यास येत असलेले अपयश, राज्यशासनाने सदरील गंभीर प्रश्न सोडविण्याबात तातडीने करावयाची ठोस कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. | उच्च व तंत्र शिक्षण |
| ६९ | मराठी भाषा आणि भाषेशी संबंधित सर्व विभाग एकाच छताखाली आणण्यासाठी मराठी भाषा भवन उभारण्याबाबत चर्चा आणि घोषणा होणे परंतू अदयाप मराठी भाषा भवनाची एकही वीट रचली गेलेली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्यासुमारास उजेडात येणे, मराठी भाषा भवनात राज्य शासनाचे भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ आदी सर्व विभाग घोषणेनुसार एकत्र काम करणार होते मात्र अद्यापही हे सर्व विभाग एका छताखाली आले नसून वेगवेगळया ठिकाणीच काम करत असल्याचे उजेडात येणे, मराठी भाषा भवन उभारण्याच्या घोषणेला मुहूर्त कधी मिळणार हा प्रश्न जनमानसात निर्माण होणे, राज्य शासनाकडून मराठी भाषा भवन उभारण्याबाबत अंमलबजावणी करण्यास होत आलेले अक्ष्यम दुर्लक्ष त्यामुळे मराठी भाषिकांमध्ये शासनाबाबत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, राज्य शासनाने मराठी भाषा उभारणीबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | मराठी भाषा |
| ७० | भिवंडी शहर महापालिकेच्या स्थानिक संस्था कर (एलबीटी) वसुली विभागामध्ये गेल्या तीन वर्षात सुमारे दीड हजार कोटींचा घोटाळा झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्यासुमारास उजेडात येणे, राज्य शासनाने जकात बंद केल्यानंतर २० मे, २०१३ पासून भिवंडी महापालिकेत एलबीटी वसुली प्रणाली सुरु करण्यात येणे, भिंवडी शहरातील ११ हजार ७२० व्यापाऱ्यांचे सर्व्हेक्षण करुन त्यांना एलबीटी कर भरण्याचे आवाहन करण्योत आले होते, मात्र शहरातील बहुसंख्य | नगर विकास |

| | | |
|---|---|---|
| | कर बुडव्या व्यापा-यांनी पालिका प्रशासनाच्या प्रमुख अधिकाऱ्यांना हाताशी धरुन दिशाभूल करणारी माहिती देऊन एलबीटी उत्पन्नाची आकडेवारी कमी देणे, त्यामुळे जानेवारी, २०१७ मध्ये ७५ लाख अशी अत्यंत कमी एलबीटीची वसुली होणे, वसुलीची आकडेवारी संशयास्पद असल्याचे आयुक्तांच्या निदर्शनास आले असता चौकशी अंती तीन वर्षात सुमारे दीड हजार कोटींचा एलबीटीमध्ये घोटाळा झाला असल्याचा संशय व्यक्त करण्यात येणे, पालिकेच्या अधिका-यांनी कमी प्रमाणात करवसूली केल्याचे उघड होणे, राज्यशासनाने भिवंडी महापालिकेच्या एलबीटी विभागात झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणी सखोल चौकशी करुन करचुकव्या व्यापारांविरोध करवसूल करुन या प्रकरणांतील दोषींवर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | |
| **७१** | मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खोपोली जवळच्या आडोशी गावाजवळ दि. २७ डिसेंबर, २०१६ रोजी चार वाहनांची धडक लागून झालेल्या भीषण अपघातात चार जणांचा झालेला मृत्यू, सहा जण गंभीररित्या जखमी झालेले असणे, या मार्गावर अनेक ठिकाणी सुरु करण्यात आलेली कामे अपूर्णावस्थेत असणे, या मार्गावर यापूर्वी अनेक अपघात होऊन झालेली जीवित हानी, अपूरी व अकार्यक्षम असलेली नियंत्रण व्यवस्था, अपघात झाल्यास अपघातग्रस्तांना वेळीच मदत पुरविण्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, अनेक ठिकाणे अपघात होण्यासारखी असताना त्यांची पाहाणी करुन देखभाल दुरुस्ती करण्याची आवश्यकता असतानाही त्याकडेही होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे भविष्यात आणखी अपघात होऊन जीवित हानी होण्यासारखी निर्माण झालेली स्थिती, याबाबत त्वरीत आढावा घेण्याची व अपघातात मृत्यू पावलेल्यांच्या कुटूंबियांना तसेच जखमी व्यक्तींनी मदत देण्याची गरज, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) |
| **७२** | नविन कायद्यांचे प्रारुप तयार करणे, अस्तित्वात असलेल्या कायद्यात, नियमात बदल करणे, गृह विभागासारख्या अत्यंत महत्तवाच्या व संवेदनशील विभागाच्या कायद्यासंदर्भातही सदर कार्यवाही करणे इत्यादी कामे खाजगी विधी कंपन्यांकडून करुन घेण्याचा दिनांक १९ जानेवारी, २०१७ रोजीच्या दरम्यान शासनाने घेतलेला निर्णय, त्यासाठी तीन कंपन्यांना मान्यता देऊन त्यांच्याबरोबर करण्यात आलेले करार, काही विषय अतिशय महत्वाचे, संवेदनशील व गोपनीय स्वरुपाचे असल्यामुळे सदरचा निर्णय गोपयितेचा भंग करणारा, संवेदनशील विषयाबाबत विपरीत परिणाम करणारा ठरण्याची शक्यता, सदर तीन कंपन्यांवर शासन नियमांची बंधने नसल्यामुळे त्यांची शासनाशी बांधिलकी नसल्याची निर्माण झालेली भिती, शासनाचे विविध विभाग व विशेष करुन शासनाचा विधी व न्याय विभाग यासंदर्भात राज्याच्या निर्मितीपासूनच सक्षम असताना असा निर्णय घेणे उचित नसणे, शासन यंत्रणेवर यामुळे अविश्वास दाखविल्यासारखे होणे, त्यामुळे त्यांचे खच्चीकरण होत असल्यासारखी स्थिती दिसून येत असणे, या निर्णयामुळे शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यात पसरेलेले संभ्रमावस्थेचे वातावरण, त्यामुळे या अनावश्यक असलेल्या खाजगीकरणाच्या निर्णयाची स्पष्टता जाहिर करण्याची आवश्यकता व यावर शासनाची प्रतिक्रिया. | विधी व न्याय |
| **७३** | सायन-पनवेल महामार्गाजवळ कोपरा गावानजिक उड्डाणपुलाजवळ मोठ्या प्रमाणात आधारकार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, आमदारांचे शिफारस पत्र आदी महत्वाच्या कागदपत्रांचा खच पडल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये उघडकीस आलेला असणे, ठाणे, मुंबई, नवी मुंबई येथील नागरिकांच्या कागदपत्रांचा | गृह |

| | | |
|---|---|---|
| | त्यात समावेश असणे, एनपीएचटी या शासकीय कागदपत्रे वाहून नेणाऱ्या एजन्सीच्या बेजबाबदारपणामुळे अतिमहत्वाची कागदपत्रे महामार्गावर पडणे, या कागदपत्रांचा दुरुपयोग होऊ शकत असल्याने या हलगर्जीपणा करणाऱ्या कंपनीविरुध्द जनमानसात निर्माण झालेला असंतोष व संतापाचे वातावरण, हलगर्जीपणा करणाऱ्या या कंपनीला दिलेले शासकीय कंत्राट त्वरीत रद्द करुन दिलेल्या रक्कमांची तातडीने वसूली करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका. | |
| **७४** | कृष्णा खो-यातील महाराष्ट्राच्या वाटयाला आलेल्या अतिरिक्त ८१ टीएमसी पाण्यावर महाराष्ट्राचाच हक्क असल्याचा निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ९ जानेवारी, २०१७ च्या सुमारास दिलेला असणे, या निर्णयामुळे राज्याच्या ६६६ दशलक्ष घनफूट इतक्या पाणी हिश्श्यात आता कोणीही वाटेकरी असणार नाही, हे ही स्पष्ट झालेले असणे, कृष्णा खो-यातील सदरचे पाणी अडविण्याची कार्यवाही तातडीने करण्याची नितांत गरज, यासाठी लागणारा सुमारे १५ ते २० हजार कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची उपाययोजना. | जलसंपदा |
| **७५** | सार्वजनिक आरोग्य विभागाने केलेल्या २९७ कोटी रुपयांच्या औषध खरेदीत गैरव्यवहार झालेला असणे, या गैरव्यवहारा प्रकणी निलंबित करण्यात आलेल्या अधिका-यांविरुध्द दोषारोप निश्चित न करताच चौकशी पूर्ण केल्याचे व यासंदर्भातील टेंडर पध्दतीचे उल्लंघन झाल्याचे यासंदर्भात चौकशी करण्यासाठी नेमलेल्या अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. भगवान सहाय यांच्या चौकशी समितीने आपल्या चौकशी अहवालात नमूद केलेले असणे, याकडे शासनाने दुर्लक्ष करुन दोषी अधिका-यांना दिलेले संरक्षण, तद्नंतर माहे डिसेंबर, २०१६ च्या दुस-या आठवडयाच्या सुमारास सदरच्या २९७ कोटी रुपये किंमतीच्या औषध खरेदीत गैरव्यवहार झाला असल्याचे शासनाने मान्य केलेले असणे, त्यानुसार त्वरीत कारवाई करण्याची आवश्यकता असतानाही शासनाकडून उचित कारवाई होत नसल्याचे दिसून येणे, परिणामी शासन दोषींना पाठीशी घालीत असल्याचे दिसून येणे,याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कारवाई. | |
| **७६** | आदिवासी विकास महामंडळातील नोकर भरती प्रक्रियेत सुमारे ३०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे केलेल्या तक्रारी, त्याअनुषंगाने सुरु करण्यात आलेल्या चौकशीस होत असलेली अक्षम्य दिरंगाई, यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेच्या सुनावणीच्या वेळी दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजीच्या दरम्यान मा. आदिवासी विकास मंत्री, आदिवासी विकास विभागाचे सचिव, सहकार आयुक्त इत्यादींना बजावलेली नोटीस, याचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर गैरव्यवहार प्रकरणी तातडीने चौकशी करुन दोषींविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता असतानाही चौकशी धीम्या गतीनेच सुरु असणे, यावरुन गैरव्यवहार करणा-यांना पाठीशी घालण्यात येत असल्याचेच दिसून येत असणे, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. | आदिवासी विकास |
| **७७** | सोलापूर येथील तंत्रनिकेतन बंद करु नका या मागणीसाठी मेसेज पाठविणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट मेसेज थांबले नाहीत तर सोलापूर पॉलिटेक्निक बंद करेन अशी धमकी देत पोलीसांत देईन अशी भाषा विद्यार्थ्यांसोबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्रीमहोदयानी केली असल्याचा बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये उघडकीस आलेली असणे, सोलापूर पॉलिटेक्निक बंद करण्याच्या बातमीमुळे या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ६०० विद्यार्थ्यांचा भवितव्याचा प्रश्न निर्माण झाल्याने त्यांनी हे पॉलिटेक्निक बंद करु नये असे मॅजेस उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांना पाठविणे, उक्त विद्यार्थ्यांना धीर देण्याऐवजी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदयांनी विद्यार्थ्यांना धमकावले व पोलीसांत देण्याची भाषा करणे व लेखी माफी माग असे सांगितलेले असणे, परिणामी मा.मंत्री महोदयांच्या अशा वागण्याने | उच्च व तंत्र शिक्षण |

| | | |
|---|---|---|
| | जनमानसात त्यांच्याविषयी निर्माण झालेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाची भावना, सोलापूर येथील पॉलिटेक्निक बंद न करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका. | |
| **७८** | नाशिक येथे मुंबई आग्रा महामार्गावर दिनांक २२ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास धुळ्याहून येणाऱ्या तीन मोटारीमधून तब्बल १ कोटी ३५ लाख रुपयाच्या जुन्या चलनातील बनावट नोटा तसेच लाखो रुपयांच्या जुन्या चलनातील खऱ्या नोटा पोलिसांनी जप्त करणे, या बनावट नोटांचे प्रकरणी संशयितांमध्ये एका मोठ्या राजकीय नेत्याचे समर्थक, श्री.छबु नागरे यांस अटक करण्यांत येणे, बनावट नोटा प्रकरणामुळे नाशिक जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडणे, या बनावट नोटाप्रकरणी श्री.नागरे यांचेसह ११ जणांना शहर पोलिसांनी अटक करणे, बनावट नोटा छापणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केलेनंतर याप्रकरणाचे धागेदोरे पुणे, सिन्नर, मुंबई, ठाणे, नवी मुंबईपर्यंत व्यापक स्वरुपात पसरलेले असल्याचे पोलिस कारवाईत समजून येणे, या टोळीविरुध्द आडगांव पोलिस ठाणे, नाशिक येथे देशद्रोहाचा गुन्हा दाखल होणे, पोलिसांनी तपासादरम्यान बनावट नोटा छापण्याचे साहित्य हस्तगत करणे, या गंभीर गुन्ह्याची पाळेमुळे खोलवर रुजलेली असल्याने याप्रकरणी उच्चस्तरीय यंत्रणेमार्फत सखोल व कठोर चौकशी व्हावी, अशी जनतेकडून मागणी केली जाणे, बनावट नोटा छापल्याप्रकरणी अटकेत असलेल्या श्री.नागरे यांच्या पत्नीवर दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास नाशिक येथील भद्रकाली पोलिस स्टेशन येथे खंडणीचा गुन्हा दाखल केला जाणे, बनावट नोटा व छपाईची सामग्री पोलिसांच्या हाती लागल्याने बनावटगिरीच्या टोळीचा हा धंदा जुनाच असल्याचा संशय व्यक्त केला जाणे, या टोळीच्या पर्दाफाशनंतर याचे लोन कुठपर्यंत पोचले आहे, याचा पोलिसांनी सखोल छडा लावावा, अशी मागणी जनतेकडून केली जाणे, बनावट नोटांचा पुरवठा केव्हा व कोणकोणास करण्यांत आला, याचा शोध घेण्यांत यावा, अशीही जनतेकडून आग्रही मागणी केली जाणे, शासनाने एकंदरीत प्रकरणाचे गांभीर्य व व्याप्ती विचारात घेऊन सी.बी.आय.मार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्याचा निर्णय तात्काळ घ्यावा, असाही सर्वसामान्य जनतेत आग्रह असणे, यानुषंगाने शासनाकडून तातडीच्या कार्यवाहीची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | गृह |
| **७९** | सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांदा तालुक्यामधील डिंगणे धनगरवाडी गावात दिनांक १६ फेब्रुवारी, २०१७ रोजी लागलेल्या पाचशे एकरातील आंबा, काजू बाग व अन्य झाडे वणव्यात बेचिराख होणे, या आगीत काही घरे, गोठे व ९५ च्या आसपास जनावरे भस्मसात झाले असणे, यात ग्रामस्थांचे कोटयावधी रुपयांचे नुकसान झालेले असणे, या परिसरात दरवर्षी बागायतींना आग लागण्याचे प्रकार घडत असतानाही याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने चौकशी करुन, या आगींमध्ये नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना त्वरीतआर्थिक वा अन्य स्वरुपाची मदत करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | वने |
| **८०** | मुंबई – पुणे एक्सप्रेस-वेच्या लगत असलेल्या महाराष्ट्र विकास रस्ते महामंडळाच्या मालकीच्या सुमारे आठ सुविधा भूखंडांच्या वाटपामध्ये व निविदा प्रक्रियेमध्ये झालेल्या घोटाळयामुळे शासनाचे २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे झालेले नुकसान, सहा विविध कंपन्यांनी सुविधा भूखंडांसाठी दिलेल्या २००० कोटी रुपयांच्या मंडळासाठी फायदेशीर निविदा २०१५ सालामध्ये साधार कारणाविना रद्द करण्याचा झालेला प्रकार. दुसरीकडे केवळ १० कोटी ४१ लाख रुपयांमध्ये ९.५० हेक्टर चे दोन भूखंड ट्रक टर्मिनसकरीता ३० वर्षाच्या मुदतीने निवेदिच्या अटी पायदळी तुडवून ठेकेदाराच्या नावे वर्ग करण्याचा झालेला गैरप्रकार, ट्रक टर्मिनससाठी वाटप केलेल्या क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्राचा वाटप ठेकेदाराकडून होत असल्याचा व अनामत रक्कमा मुदत संपल्यानंतरही | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) |

| | | |
|---|---|---|
| | जमा केल्या नसल्याकडे महामंडळाकडून झालेला कानाडोळा, शासनाच्या विविध स्तरांवर तक्रारी केल्यानंतरही आणि महालेखापालांनी आक्षेप घेऊनही याप्रकरणी ठोस कठोर कारवाई करण्याकडे शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष, याबाबत राज्यशासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. | |
| ८१ | दिनांक ७ जानेवारी, २०१७ रोजी जि.सांगली .ता. पलूस माळवाडी येथील अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार करुन खून केल्याची घडलेली घटना, तसेच दिनांक २९/१/२०१७ रोजी हिंजवडीच्या इन्फोसिस आयटी कंपनीत सॉफ्टवेअर अभियंता म्हणून काम करणा-या रसिला राजू ओपी ( वय २५, रा.हिंजवडी ) या तरुणीचा कंपनीमध्येच गळा आवळून खून झाल्याची घटना, तर पुणे शहरात हडपसर येथील शिवपार्क येथे दिनांक १८/०१/२०१७ रोजी रात्री घरगुती समस्या पत्नीने फेसबुकावर टाकल्यामुळे संतप्त पतीने पत्नीची हत्या केल्याची घटना,२३ डिसेंबर,२०१६ मध्ये अंतरा दास या संगणक अभियंता तरुणीचा हल्लेखोराने भोसकून खून झाल्याची घटना, राज्यभरात कोपर्डी ( जि.अहमदनगर ) प्रकरणाचे तीव्र पडसाद उमटले असतांनाच, उपरोक्त घटना घडत गेल्यामुळे सर्वत्र संतापाचे पसरलेले वातावरण, राज्यात उपरोक्त घटनेचे उमटलेले तीव्र पडसाद लक्षात घेऊन स्त्री आधार केंद्र संस्थेच्या अध्यक्षा, यांनी दिनांक, २७/१२/२०१६, दि.८/१/२०१७ ,१६/१/२०१७ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्रव्यवहार करुन उपरोक्त खून, बलात्कार प्रकरणातील आरोपीवर पोस्को कायद्याअंतर्गत कडक कारवाई करण्याची तसेच सदर घटनेची चौकशी संवेदनशील पध्दतीने होण्यासाठी वरिष्ठ महिला पोलीस अधिका-यांची नेमणूक करण्याची केलेली मागणी, पुणे शहरात हिंजवडी, खराडी, हा परिसर तसेच तळवडे हा पुण्यातील ग्रामीण भागात महिती—तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांची संख्या मोठी असल्याने नोकरीनिमित्त परप्रांतीय महिला, मुली मोठया संख्येने पुण्यातील वेगवेगळया भागामध्ये स्थायिक होणे, सदरहू कंपन्यामध्ये रात्री उशिरापर्यत काम करणा-या महिलांवर होणारे अत्याचार, खून यांचे प्रमाणात देखील झालेली वाढ, त्यामुंळे आय टी क्षेत्रात काम करणा-या महिलांच्या सुरक्षितेचा प्रश्न ऐरणीवर असणे, यासंदर्भात देखील स्त्री आधार केंद्र संस्थेच्या अध्यक्षा यांनी दिनांक ३०/१/२०१७ रोजी पुणे पोलीस आयुक्त, पुणे, यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीच ठोस कार्यवाही न होणे, उपरोक्त सर्वच घटनांची सखोल चौकशी करुन आरोपीवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका. | गृह |
| ८२ | पुणे जिल्हयातील फुलवडे आणि मावळमधील वडेश्वर येथील मुलींच्या आश्रमशाळांमधील विद्यार्थीनींशी असभ्य वर्तवणूक तर जुन्नर मधील कोळेवाडीतील आश्रमशाळेत मुली धोकादायक इमारतीत राहत असल्याचे जिल्हा प्रशासनाने नेमलेल्या तपासणी पथकाच्या माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास केलेल्या तपासणी अहवाल आढळून येणे, सदरचा अहवाल आदिवासी विकास विभागाकडे सादर करण्यात येणे, राज्यभरातील अनेक आश्रमशाळांमध्ये विद्याथ्र्याचे शोषण होत असल्याच्या घटना वारंवार घडत असणे, तसेच आश्रमशाळांतील विद्याथ्र्यासाठीचे ११ कोटींचे टुथपेस्ट कंत्राट खरेदी समितीने नियम धाब्यावर बसवत परस्पर अपात्र ठरवलेल्या कंपनीला दिल्या प्रकरणी मा. मुख्यमंत्री यांना दि.११.१.२०१७ रोजीच्या सुमारास लोकप्रतिनिधीनी लेखी निवेदन देण्यात येणे, याबाबत शासनाने अद्यापही चौकशी न केल्यामुळे सर्वसामान्य जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. | आदिवासी विकास |
| ८३ | त्सुनामी लाटा किनाऱ्यावर रोखणे, माश्यांच्या पुर्नउत्पादनासाठी आवश्यक असणे, तसेच हवेचे प्रदुषण कमी करण्याचे काम करण्यासाठी कांदळवनांची आवश्यकता असणे, मात्र मुंब्रा, दिवा, घोडबंदर, मीरा भाईदर, नवी मुंबई येथील कांदळवने बिल्डर आणि वाळु माफियानी नष्ठ करणे, भिवंडी आणि ठाणे | नगर विकास |

| | | |
|---|---|---|
| | तालुक्यातील १६०० हेक्टर ५० मिटर अंतरावर कुठलेही बांधकाम करण्याला उच्च न्यायालयाने मनाई केलेली असणे, तरी ठाणे महानगर पालिकेच्या क्षेत्रातकनकिया नगर, तिवारी कॉलेज रोड, शिवनेरी नगर या परिसरात बांधकाम सुरु असणे. कांदवळन नष्ट करणाऱ्या सुमारे ६२ जणावर गुन्हे दाखल होणे, मात्र कांदवळन नष्ट करण्याचा गुन्हा करण्याना भिती नसणे, याबद्दल शासनाची अक्षम्य उदासिनता, नागरिकांच्या मध्ये तीव्र चिड असणे, शासनाने करावयाची उपाययोजना आणि प्रतिक्रिया. | |
| **८४** | मालेगांव (जि.नाशिक) येथे अवैधरित्या गोवंश जनावरे आणली जात असल्याच्या तक्रारीवरून दिनांक १३ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास गोरक्षकांनी वाहन अडविणे, तद्नंतर दिनांक १४ फेब्रुवारी, २०१७ रोजी जमावाने येवून काही जणांच्या टोळक्याने गोरक्षकावर नागरी वस्तीत जीवघेणा हल्ला चढविणे, त्यात गंभीर जखमी होणे, आणि त्याची प्रतिक्रिया उमटून दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ रोजी मालेगांवी कडकडीत बंद पाळला जाणे, अनपेक्षितरित्या घडलेल्या या घटनांमुळे मालेगांव शहरात तणावाचे वातावरण निर्माण होणे, जनतेत मोठ्या प्रमाणात घबराट पसरणे, स्थानिक पोलिस प्रशासनास, कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हाताळतांना अत्यल्प संख्येने असलेले पोलिस कर्मचारी, अधिकारी व राज्य राखीव दलाच्या जवानांच्या पुरेशा बंदोबस्ताअभावी परिस्थिती हाताळतांना मोठी कसरत करावी लागणे, संवेदनशिल मालेगांव शहरात कोणत्याही शुल्लक घटनेनंतर पुणे, धुळे, नागपुर, दौंड, अमरावती, औरंगाबाद येथून राज्य राखीव दलाच्या जवानांना पाचारण करावे लागणे, तणावाचे परिस्थितीत अपुऱ्या पोलिस संख्या बळामुळे त्वरीत कारवाई करणेस विलंब होणे, त्यामुळे परिस्थिती चिघळणे, हाताबाहेर जाणे, यापुर्वीही अशांततेच्या कालावधीत या बाबींचा पुनः पुनः प्रत्यय येणे, व जिवीत वित्ताचे मोठे नुकसान होणे, अपुऱ्या संख्येने असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांमुळे गोवंश हत्या बंदी कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्यांत स्थानिक पोलिसांना अपयश येत असल्याचे सांगितले जाणे, या पार्श्वभुमीवर मालेगांवी स्वतंत्र पोलिस आयुक्तालय व राज्य राखीव दलाची स्वतंत्र कंपनी आणि नवीन आठ पोलिस ठाणी मंजुर करण्याची तसेच पोलिस कर्मचारी, अधिकारी यांची संख्या वाढविण्याची नितांत आवश्यकता, याबाबत जनता व लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मागणी केली जाणे, तसेच मालेगांव (जि.नाशिक) येथे पोलिस आयुक्तालय स्थापन करणेबाबत तारांकित प्रश्न क्रमांक १४६०० (दि.३० मार्च, २०१६) व फेर तारांकित प्रश्न क्रमांक १९७२१ (दि.२० जुलै, २०१६) अन्वये लोकप्रतिनिधींनी शासनाचे लक्ष वेधणे, यावर लेखी उत्तरात मा.मुख्यमंत्री महोदयांनी "मालेगांव (जि.नाशिक) येथे पोलिस आयुक्तालय स्थापन करणेबाबतचा फेरप्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही", असे उत्तर देणे, मालेगांव येथिल तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास नाशिक ग्रामीणचे जिल्हा पोलिस प्रमुखांनी पोलिस आयुक्तालयासह नवीन आठ पोलिस ठाण्याचा प्रस्ताव शासनास पाठविण्यांत आला असून शासन आदेशानुसार सुधारित प्रस्ताव तयार करण्यांत येत असल्याचे सुतोवाच करणे, मालेगांव पोलिस आयुक्तालय कार्यान्वयीत झाल्यास, पोलिस बळाच्या संख्येत वाढ होऊन, सातत्याने बाहेरून पोलिस बंदोबस्त मागविण्याची वेळ प्रशासनावर येणार नाही, याबाबी विचारात घेता याप्रश्नी तात्काळ निर्णय होणेची आवश्यकता, तरी शासनाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होणे, शासनाने उक्त मागणी तात्काळ मंजुर करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. | गृह |
| **८५** | राज्यातील साखर कारखान्यांना मूलभूत सुविधा संमती (इन्फ्रास्ट्रक्चर क्लीअरन्स) प्रलंबित असल्यामुळे महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी (एम.एस.सी.डी.सी.एल.) बरोबर वीज खरेदी करार (पॉवर परचेस ॲग्रिमेंट) करण्यास अडचण येणे, पॉवर परचेस ॲग्रिमेंट किमान २ हजार मेगा | उद्योग |

| | | |
|---|---|---|
| | वॉटसाठी संमती मिळणे आवश्यक असणे, ज्या कारखान्याकडे सहवीज निर्मिती प्रकल्प आहेत त्या कारखान्यांना शेतकऱ्याना एफ.आर.पी.देणे सोईस्कर होणे, परंतु ज्या कारखान्यांकडे सहवीज निर्मिती प्रकल्प नाही आहेत अशा कारखान्यांना शेतकऱ्यांना एफ.आर.पी. देण्यास अडचणी निर्माण होत असल्यामुळे ते साखर कारखाने आर्थिक संकटात सापडणे, ज्या कारखान्यांकडे सहवीज निर्मिती प्रकल्प नाहीत त्यांना सहवीज निर्मिती प्रकल्पात समाविष्ट करून घेतल्यास त्यांच्यावर येणारे आर्थिक संकट दूर होऊन त्या साखर कारखान्यांना शेतकऱ्यांना एफ.आर.पी.देणे सोईस्कर होणे, या सबब अडचणीत असलेल्या साखर कारखान्यांना व शेतकऱ्यांना न्याय मिळणेसाठी शासनाने करावयाची उपाययोजना वा केलेली कार्यवाही. | |
| **८६** | मालेगांव (जि.नाशिक) येथे सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरी लाऊन देण्याचे आमिष दाखवून बनावट पी.डब्ल्यु.डी. वेब मॅनेजमेंट कंपनी स्थापन केली जाणे, खोटी नियुक्ती पत्रे देऊन १२० बेरोजगार तरूणांची कोट्यावधी रुपयांची फसवणूक करण्यात येणे, याप्रकरणातील मुख्य संशयितांकडून २ कोटी ८६ लाख रुपयांची मालमत्ता, दिनांक २८ ऑगस्ट, २०१६ रोजी जप्त केली जाणे, बेरोजगार तरूणांना दिलेल्या नियुक्ती पत्रावरील सार्वजनिक बांधकाम खात्याचे शिक्के व वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या बनावट असल्याचे सिध्द होणे, दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाचे तत्कालिन सचिवांच्या स्वाक्षरीचे नमुने तपासण्यासाठी पाठविण्यात येणे, मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर करणे, महाराष्ट्र विधान परिषदेत दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी उपस्थित तारांकित प्रश्न क्रमांक १४६६८ च्या लेखी उत्तरात मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांनी ‘‘चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून यामध्ये श्री.भुषण शेवाळे यांनी महाराष्ट्र शासन व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे नावाचा दुरूपयोग करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी पी.डब्ल्यु.डी. वेब कंपनी स्थापन केली व उमेदवारांना सरकारी नोकरीचे आमिष दाखवून त्यांची फसवणुक केली असल्याचे नमुद करणे, या अत्यंत गंभीर अशा प्रकरणी सी.आय.डी./सी.बी.आय.मार्फत सखोल चौकशीची व पाळेमुळे काढण्याची मागणी केली जाणे, या प्रकरणात कोण-कोण दोषी आहेत, ते उघड व्हावे, अशीही सार्वत्रिक मागणी केली जाणे, शासनाने याप्रकरणी वरिष्ठ स्तरावरून चौकशी करण्याची आवश्यकता, तरी, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) |
| **८७** | देशभरातील ६६ हजार ६६३ लोकवस्त्यांमधून पुरविल्या जाणाऱ्या पिण्याच्या पाण्यामध्ये आर्सेनिक आणि फ्ल्युराईडस् हे घातक विषारी घटक असल्याचे निदर्शनास आल्याची माहिती दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास प्रसिध्द होणे, सर्वाधिक दुषित पाणी असलेल्या राज्यात महाराष्ट्राचा समावेश नसणे, तरी राज्यातील अनेक प्रमुख व लहान मोठ्या नद्यांचे पाणी प्रदुषित असणे, सांडपाणी, जनावरांचे रक्त व मांस मिश्रीत पाणी, रासायनिक प्रक्रिया केलेले पाणी, विषारी रंग द्रव्ये असलेले पाणी नदीपात्रात मिसळत असल्याच्या पर्यावरण प्रेमी नागरिकांच्या तक्रारी असणे, मालेगांव (जि.नाशिक) येथील मोसम नदीपात्र सर्वाधिक प्रदुषित असणे, रक्त मांस मिश्रीत पाणी, रंग व रासायनिक केमीकल मिश्रीत पाणी पात्रात येत असल्याने व हे पाणी पुढे गिरणा धरणात जात असल्याने मोसम नदी पात्राचे प्रदुषण थांबविण्याची मालेगांवकरांकडून वारंवार मागणी केली जाणे, मोसम नदीचे प्रदुषण रोखण्याकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होणे, गतकालावधीत गिरणा धरणातील पाण्यात मानवी शरीरास अपायकारक ठरणारी घटक द्रव्ये आढळून आल्याच्या तक्रारी नागरीकांकडून केल्या जाणे, दरम्यान ग्रामीण भागातील जनतेला पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी पाणी तपासणी करणाऱ्या प्रयोगशाळांच्या | पाणीपुरवठा आणि स्वच्छता |

| | | |
|---|---|---|
| | बळकटीकरणाचा निर्णय राज्य सरकारकडून घेतला जाणे, यानुषंगाने राज्यातील २३ जिल्ह्यांत पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा बांधकामास शासनाने मंजुरी देणे, त्यामध्ये नाशिक विभागातील जळगांव, नंदुरबार व अहमदनगर या तीन जिल्ह्याचा समावेश असणे, त्यासाठी प्राथमिक टप्प्यात ७ कोटी २२ लाखांचा निधीही उपलब्ध करून देणे, तत्राप, उपक्रमात सहभागाची संधी न मिळाल्याने नाशिक जिल्ह्यातील प्रस्तावित पाणी तपासणी प्रयोगशाळा इमारतीचे बांधकाम पुन्हा रेंगाळले असल्याचे दिनांक : ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, राज्यात ठिकठिकाणी अशुध्द पाणी पिण्यात आल्याने होणाऱ्या आजारांत मोठी वाढ झालेली असणे, याला आळा घालण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत व्यापक उपाययोजनांचे नियोजन केले जाणे, तरी, ग्रामीण भागात पाणी पुरवठा करणाऱ्या जलस्त्रोतांचे रासायनिक व जैविक गुणवत्ता तपासणी करण्याच्या आवश्यकतेत वाढ झालेली असणे, यापार्श्वभुमीवर तसेच मालेगांव (जि.नाशिक) सारख्या ठिकाणी मोसम नदीतील भीषण प्रदूषण विचारात घेता नाशिक जिल्ह्याचाही शासनाच्या प्रयोगशाळा बळकटीकरणाच्या धोरणांतर्गत समावेश होण्याची निकड, शासनाने याप्रकरणी तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | |
| ८८ | परळी वैद्यनाथ येथील वैद्यनाथ नागरी सहकारी बँकेत सुमारे २०० कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आलेले असणे, बँकेचे चेअरमन व संचालक यांनी सन २०१२-१३ ते सन २०१६ या कालावधीत बेकायदेशीर कर्जवाटप केल्यामुळे सदरचा घोटाळा झाल्याचेही उघडकीस आलेले असणे, एवढया दीर्घ काळापासून हा गैरव्यवहार झालेला असतानाही त्याबाबतच्या चौकशीकडे झालेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, बँकेच्या राज्यातील ४४ शाखांमधील खातेदार व ४० हजारांपेक्षा जास्त असलेल्या सभासदांवर ओढवलेली आपत्ती, सदर प्रकरणी चौकशी होऊन दोषींविरुध्द कारवाई होत नसल्यामुळे दोषींना मिळत असलेले संरक्षण, यात शासनाने तातडीने लक्ष घालून बँकेचे खातेदार व सभासद यांना दिलासा देण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कारवाई.” | सहकार |
| ८९ | पुणे शहराच्या पूर्व भागासाठी ३८० कोटी १६ लाख रुपये खर्चाची भामा आसखेड पाणी पुरवठा योजना राबविण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय, सदर योजनेचे काम जानेवारी,२०१४ मध्ये सुरु केलेले असणे, योजनेचे काम जून,२०१६ पर्यंत पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित केलेला असणे, मात्र अद्यापही काम अपूर्णावस्थेत असणे, सुमारे तीन वर्षापूर्वी केंद्र शासनाने जेएनएनयूआरएम योजनेंतर्गत २५८ कोटी रुपयांचा मंजूर केलेला निधी, त्यापैंकी १०६ कोटी रुपयांचा निधी प्रत्यक्षात पुणे महानगरपालिकेला केंद्र शानाने दिलेला असणे, उर्वरित निधी मिळणे कामाच्या पूर्ततेवर अवलंबून असणे, विशिष्ट कालावधीत योजनेचे काम पूर्ण न झाल्यास निधी मिळण्यात उद्‌भवणा-या अडचणी, परिणामी योजनेवर होणारा परिणाम, ऑक्टोबर, २०१५ पासून वर्षभर योजनेचे काम बंद असणे, आता मार्च, २०१७ अखेरपर्यंत कामे पूर्ण करण्यासाठी दिलेली वाढीव मुदत या मुदतीतही काम पूर्ण होणे अशक्य असणे, योजनेच काम रखडल्यामुळे आता १०० कोटी रुपयांचा भूर्दंड सोसावा लागण्याचा निर्माण झालेला प्रश्न, पुणे शहराच्या पूर्व भागातील पाणी पुरवठयाचा असलेला गंभीर प्रश्न व योजनेची कामे पूर्ण करण्यात निर्माण झालेल्या अडचणी विचारात घेता शासनाने यात त्वरीत लक्ष घालण्याची आवश्यकता, त्याकडे शासनाचे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, यात दाखविण्यात येत असलेली अनास्था, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची उपाययोजना. | नगर विकास |
| ९० | वसई येथील औद्योगिक वसाहतीमधील एका कारखान्यात अंगणवाडी पोषण आहाराच्या पाकीटावरील तारखा बदलल्या जात असल्याचा माहे जानेवारी,२०१७ च्या दुस-या आठवडयाच्या सुमारास उघडकीस आलेला प्रकार, त्यावेळी मुदतबाहय आणि विना तारखेची हजारो पाकिटेही आढळून | महिला व बाल कल्याण |

| | | |
|---|---|---|
| | आलेली असणे, पोलिसांनी हा माल जप्त करुन अन्न व औषध प्रशासनाकडे तपासासाठी पाठविलेला असणे, महिला व बालविकास विभागामार्फत कुपोषणावर मात करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या योजनेंतर्गतचा सदर पोषण आहार असल्याचेही उघडकीस आलेले असणे, डिसेंबर,२०१६ ची मुदत संपलेली पाकिटे टेम्पोने गोदामाबाहेर नेण्यात येत असल्याचे तसेच पाकीटांवरील तारखा पुसण्याच्या थिनरच्या बाटल्या व तारखेचा स्टॅम्प इत्यादी साहित्य आढळलेले असणे, असेच प्रकार अन्य ठिकाणीही घडण्याची शक्यता, या प्रकारांवर नियंत्रण ठेवण्याचे काम शासनाचे म्हणजेच महिला व बालविकास विभागाचे असतानाही त्यांचेकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी लाभार्थी बालकांच्या आरोग्यावर होणारा परिणाम, त्यांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाच्या उपाययोजना. | |
| ९१ | नाशिक शहर हद्दीत जानेवारी, २०१६ ते सप्टेंबर, २०१६ या नऊ महिन्याच्या कालावधीतच अपघाताच्या एकुण ७८६ घटना घडल्याचे दिनांक : ४ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास प्रसिध्द माहितीवरून निदर्शनास येणे, या अपघातात जीवघेण्या व गंभीर अपघातांची संख्या ३३३ इतकी असणे, रस्ते अपघातात १४७ व्यक्तींना आपल्या प्राणांस मुकावे लागणे, अनेकांना गंभीर दुखापत होणे, जानेवारी ते एप्रिल, २०१६ या कालावधीतील एकूण ३९३ अपघातांपैकी तब्बल ९४ घटनांमध्ये अपघातास कारणीभुत असलेले वाहन चालक घटना स्थळावरून फरार झाल्याचे समोर येणे, अपघाताच्या घटनेनंतर पळून जाणे (हिट ॲण्ड रन) कायद्याने गुन्हा असणे, हिट ॲण्ड रनच्या बऱ्याच केसेस पादचारी व्यक्तीच्यासंबंधी किंवा रात्रीच्या वेळेस झालेल्या असणे, अशा घटनांमध्ये जखमी व्यक्तीस वेळीच उपचार न मिळाल्याने मृत्युमुखी पडण्याची शक्यता अधिक प्रमाणात असणे, हिट ॲण्ड रनच्या घटना नाशिक महानगरात सातत्याने घडणे, यासंख्येत वाढ होणे, हे प्रकार रोखण्यासाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे उपयोगी ठरणे, मात्र, सिंहस्थ कुंभमेळादरम्यान नाशिक शहरात ठिकठिकाणी बसविण्यात आलेले सी.सी.टी.व्ही. काढून घेण्यात येणे, हिट ॲण्ड रनचे प्रकार सर्वत्रच वाढत असल्याने शासनाने कठोर प्रतिबंधात्मक उपाय त्वरीत अंमलात आणण्याची गरज, शासनाने दुचाकी चाविणाऱ्यांसाठी १८ वर्षे पुर्ण वयाची मर्यादा निश्चित केलेली असणे, पण गेल्या काही कालावधीपासून ठिकठिकाणी अल्पवयीन मुले सर्रास दुचाकी चालवत असल्याचे निदर्शनास येणे, या अल्पवयीन मुलांकडूनच त्यांच्या दुचाकी ‘धुम स्टाईल’ ने पळविल्या जात असल्याने गंभीर स्वरुपाचे अपघातात सातत्याने वाढ होणे, या अल्पवयीन मुला-मुलींकडे मोपेडबरोबरच गिअरच्या दुचाकी सर्रासपणे पालकांनी सुपूर्द केलेली असणे, त्यामुळे अपघातांची संख्या वाढणे, शहरात विविध कॉलेज रस्त्यांवर व अन्य मार्गावरही तरूणांकडून सुसाट वेगाने दुचाकी चालविण्याचे प्रकारात मोठी वाढ होणे, अनियंत्रित वेग आणि दुचाकीवर असतांना मोबाईल सुरु ठेवणे, चित्र - विचित्र हावभाव - कसरती करणे, यामुळेही अपघातात आणि हिट ॲण्ड रनच्या प्रकारात वाढ झाल्याचे दिसून येणे, ज्येष्ठ नागरिक व विशेषतः कॉलेज तरूणींना या रोड रोमीओ मवाली, टवाळखोर दुचाकी मोटार सायकलस्वारांचा सर्वत्रच मोठा व असह्य जाच असणे, स्थानिक पोलिस प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होणे, याप्रकारामुळे अनेक जेष्ठ नागरिक सर्वसाधारण महिला व पुरूष तसेच मुला-मुलींना कायमचे जायबंदी व्हावे लागत असल्याने या ‘धुम स्टाईल’ स्टंटबाजीस कठोर कारवाईद्वारे तात्काळ रोखण्याची आवश्यकता, तसेच अल्पवयीन मुलांकडे दुचाकी नको याबाबत व्यापक जनजागृती करण्याची गरज, स्थानिक विभागांचे याकडे झालेले दुर्लक्ष, शासनाने याबाबत केलेली वा करावयाची कारवाई, शासनाचे धोरण व शासनाची प्रतिक्रिया. | परिवहन |

| | | |
|---|---|---|
| ९२ | उच्च शिक्षणाचे प्रमुख केंद्र म्हणून नवी मुंबईचा देशभर नाव लौकिक असणे, देशाच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येणे, परंतु ज्यांच्या जमिनीवर या संस्था उभ्या राहिल्या त्या प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना मात्र उच्च शिक्षणाच्या फारसा लाभ न होणे, वैद्यकीय, अभियांत्रिकी व इतर शाखामध्ये पाच टक्के जागाही आरक्षित ठेवल्या जात नसल्याने नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होणे, सिडकोने नवी मुंबईची उभारणी करताना शैक्षणिक सुविधांवर विशेष लक्ष दिलेले असणे, प्रत्येक नोडमध्ये प्राथमिक ते उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे, देशातील नामांकित शिक्षण संस्थांच्या शाखा या परिसरामध्ये सुरू असणे, एज्युकेशन हब म्हणून शहराला नावलौकिक प्राप्त झाला असणे, नवी मुंबई महानगरपालिका, पनवेल व उरण परिसरातील सिडको क्षेत्रामध्ये तब्बल ५३९ शैक्षणिक संकुल असणे, यामधून जवळपास ३ लाख विद्यार्थी शिक्षण घेत असणे, उच्च शिक्षण देणाऱ्या १२४ शैक्षणिक संस्था असून त्यामध्ये जवळपास १ लाख ४१ हजार ४८८ विद्यार्थी शिक्षण घेत असणे, वैद्यकीय, अभियांत्रिकी, फॅशन डिझायनिंग, व्यवस्थापनशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र या शाखांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी प्रत्येक राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा सुरू असणे, या महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी दलालांचाही सुळसुळाट झालेला पाहावयास मिळणे, प्रवेशासाठी लाखो रूपये घेउन विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याच्याही अनेक घटना घडल्या असणे, देशातील व राज्यातील अनेक राजकीय नेत्यांची मुलेही शिक्षणासाठी नवी मुंबईला प्राधान्य देत असणे, परंतु ज्या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीवर या शैक्षणिक संस्था उभ्या आहेत त्या भूमिपूत्रांच्या मुलांना मात्र या संस्थांमध्ये सहज प्रवेश मिळत नसल्याने उच्च शिक्षणापासून त्यांना वंचित ठेवले जात असणे, सबब याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना. | नगर विकास |
| ९३ | मुंबईतील पालिकेच्या नायर रुग्णालयात डोळया संबंधित शस्त्रक्रिया विभागात छतातून पाणीगळती सुरु असलयाचे दि.११.२.२०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनस आलेले असणे, या विभागात प्लॉस्टर तुटलेल्या स्थितीत असून ब-याच दिवसापासून ही समस्या असणे, या रुग्णालयात डोळयांवर उपचार करण्यासाठी येणा-यया रुग्णांची संख्याही मोठी असणे, परंतू यामुळे त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात अडचणी येत असणे, तसेच शेडयूलमध्ये असलेल्या शस्त्रक्रियांचा तारखाही पुढे ढकलण्यात येत असणे, याचा रुग्णांना नाहक त्रास हात असणे, डोळयांची शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना कुठल्याही प्रकारचा संसर्ग होऊ नये याकरिता रुग्णालयात विशेष काळजी घेणे गरजेचे असतानाही शासन याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील रुग्णांत व त्यांच्या नातेवाईकांत निर्माण झालेली तीव्र असंतोष व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने या शस्त्रक्रियागृहाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया | सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण |
| ९४ | राज्यात गेल्या १० महिन्यात १२ हजार नवीन कुष्ठरुग्णांची नोदं करण्यात आली असून यात मुंबईतील ५०० रुग्णांचा समावेश असल्याचे दि.५.२.२०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले असणे, सन २०१५-१६ या वर्षात् राज्यात १३ टक्के रुग्णाची नोंद झालेली असणे, याच कालावधीत मुंबई ५८६ कुष्ठरुग्ण आढळून आले असून यात ६८ लहान मुलांचा समावेश असणे, कुष्ठरोगाचा हा विषाणू राज्यातील १६ जिल्हयांमध्ये पसरला असणे, आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार आता १० हजार लोकांमध्ये ९७ लोकांना कुष्ठरोगाची लागण होत असल्याचे समोर आलेले असणे, राज्यासह मुंबईत कुष्ठरोगांच्या वाढत्या संख्येबाबत तज्ञांद्वारे चिंता व्यक्त होत असतानाही शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी जनमानसात शासनाप्रती निर्माण झालेली तीव्र | सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण |

| | | |
|---|---|---|
| | अंसतोष व चिडीची भावना त्यामुळे शासनाने निधीची तरतूद करुन कुष्ठरोगाबाबत जागृतीसाठी शिबीरे आयोजीत करण्यासोबतच या रोगाच्या वाढत्या प्रसाराला आळा घालण्याबाबत करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. | |
| ९५ | मुंबईसह रायगड किनारपट्टीच्या भागात राहणा-या नागरिकांना उपचारासाठी अनेकदा मुंबईत यावे लागते हे लक्षात घेऊन त्यांचा वेळ वाचावा या हेतूने प्रायोगिक तत्वावर सागरी रुग्णवाहिका सुरु करण्याचा महाराष्ट्र सागरी मंडळाचा प्रस्ताव असल्याचे दि.२३.१.२०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले असणे, या प्रस्तावानुसार वांद्रे व मांडवा येथे या रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार असून त्यामुळे अदययावत तंत्रज्ञान असलेली उपकरणे, साहित्ये तसेच तज्ञ डॉक्टरही असतील, काही वर्षापूर्वी सार्वजनिक आरोग्य विभागाने दुर्गम भागातील खाडीकिना-यावरिल नागरिकांसाठी बोट रुग्णवाहिका सुरु केली असणे, डॉक्टर त्या बोटीतून त्या भागात जाऊन नागरिकांवर उपचार करीत असणे, त्याला चांगला प्रतिसादही मिळालेला असणे त्याच धर्तीवर सागरी रुग्णवाहिका सुरु करण्याचा प्रस्ताव सागरी मंडळाने तयार केलेला असणे, परंतू या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत सागर करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनमानसात शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना त्यामुळे शासनाने जनहीत लक्षात घेऊन सदर प्रस्तावाला तातडीने मंजूरी देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण |
| ९६ | थॅलेसेमिया रोगाचा सामना करणा-या रुग्णांच्या संखेत दिवसेंदिवस वाढ होत असून, यामध्ये बालरुग्णांचे प्रमाण सर्वाधिक असणे, ठराविक कालावधीत ब्लड ट्रान्समिशन, चाचण्या अशी उपचार पध्दती असणा-या या रुग्णांच्या औषधांच्या कोर्समध्ये खंड पडल्यास या रुग्णांच्या यकृताला सूज येण्याची भीती असल्याने त्यांना डेफ्रिजेट आणि डेसिरॉक्स ही औषधे नियमित देणे गरजेचे असणे, मात्र हि औषधे सर्वसामान्य दुकानात न मिळता फक्त सरकारी रुग्णालयातच मिळत असणे, दोन महिन्यांपुर्वी ठाणे येथील सिव्हील रुग्णालयातील औषधांचा साठा संपल्याने रुग्णांच्या पालकांना अन्य सेन्टर्सचा आधार घ्यावा लागत असताना आरोग्य भवनातून त्यावेळी हा साठा स्थानिक रुग्णालयांना अल्प प्रमाणात पोहचविण्यात आलेला असल्याने तो लगेच संपून गेल्याने आता पुन्हा मागील एक महिन्यापासून या औषधांचा साठा संपुष्टात आलेला असून, आरोग्य विभागाकडे वारंवार चौकशी केली असता टेंडर न निघाल्याने साठा पोहचविण्यात आला नसल्याचे कारणे देण्यात आलेले असणे, यामुळे याप्रकरणातील आरोग्य विभागाच्या प्रशासकीय कारभाराचा भोंगळपणा यातून स्पष्ट होत असून, साधारणपणे ज्या अत्यावश्यक गोष्टी आहेत त्याची पूर्व तजवीज करून ठेवणे गरजेचे असणे किंवा त्याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेऊन रुग्णांना कोणत्याही परिस्थिती अत्यावश्यक औषधे मिळण्यात खंड पडणार नाही याची काळजी घेणे गरजेचे असताना याबाबीकडे संबंधितांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले असल्याने, ठाणे जिल्ह्यातील ६०० रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मागील दोन ते तीन महिन्यांपासून अनेक अडचणी व संकटांचा सामना करावा लागत असल्याने, थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांना रोजचा औषधाचा डोस न मिळाल्यास त्यांना होणारा त्रास व त्याचा त्यांच्या शरीरावर परनाम याची जाणीव असतानाही त्याबाबत योग्य ती उपाययोजना करण्यात अपयशी ठरलेल्या ठाणे सिव्हील रुग्णालय व आरोग्य विभागातील संबंधित दोषींची सखोल चौकशी होऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याबरोबरच थॅलेसेमिया रुग्णांना लागणारा औषधासाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देऊन रुग्णांना आवश्यक | सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण |

| | | |
|---|---|---|
| | त्यावेळी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, केलेली कारवाई व शासनाची भूमिका. | |
| ९७ | राष्ट्रीय आरोग्य अभियान सन २०१७ मध्ये कायमस्वरूपी बंद होत असल्याने राज्यातील सुमारे ६० हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांना नोकरीस मुकावे लागणार असणे, राज्य शासनाने सुरू केलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे राज्यात आरोग्याचे काम चांगले झालेले असणे, अभियान कायमस्वरूपी बंद होत असल्याने हजारो कंत्राटी कर्मचारी व अधिकारी यांच्या कुटुंबांना आर्थिक संकटाला सामोरे जाणेसाठी भाग पडणे, याबाबत दि.१३ ऑक्टोबर २०१६ मध्ये कंत्राटी कर्मचारी व अधिकाऱ्यांनी एक दिवसाचे कामबंद आंदोलन करणे, सबब याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना. | सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण |
| ९८ | नभुक्र ६२९ (भाग) वांद्रे व्हिलेज, खेरवाडी वांद्रे (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत कनाकिया पॅरिस या विकासकाकडून विकसीत करण्यात येत असलेल्या महाराष्ट्र नगर को ऑ.हौ.सोसायटी अंतर्गत सागरी हद्द नियंत्रण कायद्याचे उल्लंघन करुन विकासकाने बांधकाम केल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ वा त्या सुमारास उघडकीस येणे, या योजनेत मिठी नदीची रुंदी कमी करुन विकासकाने बांधकाम केलेले असल्याने अतिवृष्टी झाल्यास वाकोला नाला व मीठी नदी परिसरातील झोपड्यांना धोका निर्माण झालेला असणे, विक्री इमारतीचे बांधकाम करताना सी.आर.झेड. नियमाचे झालेले उल्लंघन, अनधिकृतपणे करण्यात आलेली झाडांची कत्तल मा. लोक आयुक्तांकडे करण्यात आलेली तक्रार, त्यानुषंगाने कार्यवाही करणेबाबत एस.आर.ए. ला दिलेले निर्देश नाल्याची रुंदी कमी केल्याचे, इमारतीचे बांधकाम सी.आर.झेड क्षेत्रात झाल्याचे एस.आर.ए. च्या तपासात निष्पन्न होणे, यामध्ये पर्यावरण कायद्याचे उल्लंघन, संबंधीत विभागाकडून कोणतीही परवानगी न घेता करण्यात आलेले बांधकाम, अशाप्रकारचे अतिक्रमण २६.७.२००५ सारखी पुरपरिस्थिती निर्माण करणारे तसेच परिसरातील नागरीकांच्या जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असणे, नदीच्या दोन्ही बाजूंनी १२० मीटर चे अंतर ठेवणे, नियमानुसार बंधनकारक असणे, या परिसरातील कांदळवणाची विकासकाने कत्तल केलेली असणे, या सर्व बाबी विचारात घेवून एस.आर.ए. कडून काम थांबविण्याबाबत नोटीस पाठविण्यात येणे, याविरुध्द न्यायालयात जावून विकासकाने २ आठवड्याची स्थगिती मिळवणे, यानंतर तीन महिन्याचा कालावधी उलटूनही विकासकाविरुध्द कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, यामध्ये शासनाने हस्तक्षेप करुन प्रकल्प थांबविण्याची आवश्यकता, नागरीकांच्या जिवितास निर्माण झालेला धोका, शासनाने याबाबत करावयाची कारवाई व उपाययोजना. | गृहनिर्माण |
| ९९ | सिंधुदूर्ग जिल्हयातील मालवण-देवगड या सागरी महामार्गावरील सार्व.बांधकाम विभागाच्या मालवण येथील कोळंब पुलाच्या पिलर्सना मोठया प्रमाणात तडे गेल्याने अवजड वाहतुकीस धोकादायक बनलेला असणे ७ महिन्यापूर्वी महाड येथे सावित्री नदीवरील पूल वाहून जिवीतहानी झाल्याची घडलेली गंभीर घटना, या पुलावरुन एस.टी.ची वाहतूक व इतर वाहनाची सतत चालू असलेली रहदारी, त्यामुळे प्रवाश्यांच्या जिवीताला निर्माण झालेला धोका, सदर पुल दुरुस्त करण्याबाबत शासनाकडून कोणतीच अद्यापी कार्यवाही न होणे, त्यामुळे जनमानसात पसरलेले कमालीचे संतापाचे वातावरण, याबाबत शासनाची भूमिका व करावयाची तातडीची कार्यवाही वा प्रतिक्रिया. | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) |
| १०० | सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर ता. कोरेगांव येथील एका सेवा निवृत्त सुभेदारास मंजूर करण्यात आलेल्या भुखंडाची कागदपत्रे संबंधित विभागात उपलब्ध नसल्याचे बेजबाबदार उत्तर माहे फेब्रुवारी, २०१७ वा त्या सुमारास माहिती अधिकारात प्राप्त होणे, जिल्हाधिकारी सातारा यांचे दिनांक १२.८.१९६८ तसेच | महसूल |

| | | |
|---|---|---|
| | नगर भुमापन कार्यालय यांचे दिनांक २०.९.१९६८ च्या पत्रान्वये रविवार पेठ सी टी सर्व्हे क्रमांक १६६ अ/१, सातारा येथील भूखंड मंजूर करण्यात येणे, सदर पत्रान्वये त्यांना त्या भूखंडाची किंमत म्हणून रुपये ३६४७/- कोषागारामध्ये भरण्याचे आदेश देण्यात येणे, त्यानुषंगाने त्यांनी दिनांक ११.१०.१९६८ रोजी भुखंडाचा मोबदला म्हणून रुपये ३६४७/- कोषागारात चलनाने भरणा करणे, सदर चलनाची प्रत जोडून भुखंडाचा ताबा मिळणेकरीता नगर भुमापन अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करण्यात येणे, संबंधित सुभेदार यांनी भारतीय सेवा दलात एकूण ३४ वर्षे सेवा बजावलेली असणे, भूखंड मंजूर होऊनही व त्या बाबतची किंमत चलनाने कोषागारात भरुनही अद्यापही भुखंडाचा ताबा न मिळणे, अर्जदाराचे वय १०० वर्ष असणे, याबाबत त्यांना झालेला व होणारा मनस्ताप, सेवानिवृत्त सुभेदारास त्यांच्या वयोमानाचा विचार करुन मंजूर झालेला भूखंड वितरीत करण्याची नितांत आवश्यकता, याबाबतचा संपूर्ण दस्तऐवज संबंधिताकडे उपलब्ध असणे, याबाबत शासनाने करावयाची त्वरीत उपाययोजना व याबाबत शासनाची भूमिका. | |
| **१०१** | मुंबईतील नामांकित वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अनुसूचित जमातीच्या नावाने खोटी जात प्रमाणपत्रे बनवून राखीव जागांवर डल्ला मारण्याचे रॅकेट गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असल्याचे पोलिसांच्या तपासात उघड झाले असणे; केवळ वैद्यकीयच नव्हे तर एम बी ए, अभियांत्रिकी अशा अनेक व्यवसायिक अभ्यासक्रमांमध्ये हजारो विद्यार्थ्यांनी खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे प्रत्येकी २० ते २५ लाखापर्यंत पैसे देऊन प्रवेश घेतले असणे; महाराष्ट्रात उस्मानाबाद, नंदुरबार आदी जिल्ह्यातील जात पडताळणी समित्यांच्या बनावट सही शिक्क्यांच्या द्वारे हि खोटी प्रमाणपत्रे आजवर बनवून देणे; त्यामुळे गरीब व गरजू विद्यार्थ्यांचे नुकासान होणे; सदर विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जागांवर बनावट जात प्रमाणपत्रांच्या आधारावर इतर विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देणाऱ्या समाजकंटकावर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. | वैद्यकीय शिक्षण |
| **१०२** | गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील चिचोडा या गावातील मनोहर आटला व रमेश या दोघा गावकऱ्यांची नक्षलवाद्यांनी दि. १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केलेली निर्घुण हत्या, हे दोन्ही गावकरी पोलीस खबरी असल्याच्या संशयातून या गावकऱ्यांची हत्या झाल्याचा पोलिसांना असलेला संशय, यापूर्वी सुध्दा याच ठिकाणी सुमारे १२ लोकांची नक्षलवाद्यांनी केलेली हत्या, त्यामुळे तेथील नागरीकांत पसरलेले भितीचे वातावरण, नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्यात पोलिसांना पर्यायाने शासनाला आलेले अपयश, नक्षलवाद्यांचा त्वरीत बंदोबस्त करणेबाबत व हत्या करणाऱ्या नक्षलवाद्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. | गृह |
| **१०३** | ठाणे जिल्ह्यातील भाईंदर येथील आझादनगर भागातील एका ४ वर्षीय बालिकेचे अपहरण करुन तिच्यावर बलात्कार करुन तिची हत्या केल्याची घटना दि. १५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासूमारास उघडकीस येणे, पिडीत बालिकेला ९ जानेवारी, २०१७ रोजी रात्री ८.०० वाजता चॉकलेट देण्याचे आमिष दाखवून ४ आरोपींनी तिच्यावर बलात्कार करुन हत्या केल्याने तेथील नागरीकांत विशेषत: लहान मुलींमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, आरोपींना तात्काळ अटक करुन संबंधीत आरोपींविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. | गृह |